| ०७. डॉ. मोईन शाकीर व्याख्यानमाला | ०८. नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला |
| ०९. वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमाला | १०. शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे व्याख्यानमाला |

विद्यापीठ प्रांगण,
छत्रपती संभाजीनगर.
संदर्भ क्र. : संविक/व्याख्यानमाला/२०२५-२६/
दिनांक : ०८ जुलै २०२५/6054-6547

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

याची एक प्रत :

०१) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०२) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०३) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, धाराशिव.
०४) संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०५) मा. वित्त व लेखाधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०६) मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०७) मा. प्र-कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०८) मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
०९) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

स्वाक्षरीत
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

(नॅक अ+ दर्जा)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## विद्यार्थी विकास मंडळ

## शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६

## व्याख्यानमाला, विविध कार्यशाळा/ शिबिरे/ स्पर्धा करिता आवश्यक कागदपत्र

१) नॅक मूल्यांकन झालेल्या महाविद्यालयास प्राधान्य देण्यात येईल. करिता नॅक मूल्यांकन झाल्याचे प्रमाणपत्र.

२) शैक्षणिक वर्ष २०२४ मध्ये युवा महोत्सवात सहभाग नोंदवल्याचे कोणत्याही एका सहभागीचे प्रमाणपत्र/युवा महोत्सवासंदर्भात दंड वा शुल्क भरल्याची पावती/विद्यार्थी विकास विभागाचे ९ मे २०२५ नंतरचे ना-हरकत प्रमाणपत्र.

३) महाविद्यालयात स्थापन केलेल्या अँन्टी रॅगिंग (Anti Ragging Committee) समितीची माहिती.

४) विभाग/महाविद्यालयातील विद्यार्थी तक्रार निवारण समिती (Student Grievance Redressal Committee) ची माहिती.

५) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ युवा महोत्सव व लोककला महोत्सवाकरिता **सांस्कृतिक समन्वयक** नियुक्त केल्याची माहिती.

६) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ आविष्कार करिता **आविष्कार समन्वयक** नियुक्त केल्याची माहिती.

( नॅक अ+दर्जा )

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## विविध कार्यशाळा, शिबिरे, स्पर्धा : वर्ष २०२५-२६

## : परिपत्रक :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागात दरवर्षी विविध कार्यशाळा, शिबिरे व स्पर्धाचे आयोजन केले जाते. याकरिता विद्यापीठातर्फे निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. खाली दर्शवलेले उपक्रम आपण आपला विभाग/ महाविद्यालयात आयोजित करु इच्छित असल्यास दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत सोबत नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव पाठवावा, ही विनंती.

| अ.क्र. | उपक्रम | किमान विद्यार्थी संख्या | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | उद्योजकता विकास कार्यशाळा | ४० | २ दिवस |
| २. | नवोदित लेखकांसाठी कार्यशाळा | ४० | २ दिवस |
| ३. | नाट्य प्रशिक्षण शिबिर | ४० | २ दिवस |
| ४. | पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण | ४० | २ दिवस |
| ५. | व्यसनमुक्ती महाविद्यालयीन स्पर्धा | ४० | २ दिवस |
| ६. | सामान्यज्ञान स्पर्धा | ४० | २ दिवस |

वरील सर्व उपक्रमाकरिता येणाऱ्या शिबिरार्थीचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता विद्यार्थी ज्या महाविद्यालय / विभागाचे असतील त्या संबंधित महाविद्यालय / विभागांनी स्वत:च्या निधीतून करावयाचा आहे. दि. ३१ जुलै २०२५ नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

विद्यापीठ प्रांगण,
छत्रपती संभाजीनगर.
संदर्भ क्र. : संविवि/कार्यशाळा,शिबीरे,स्पर्धा /
२०२५-२६/६५४८-७०३४
दिनांक : ०८ जुलै २०२५

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

**याची एक प्रत :**

१) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, धाराशिव.
४) संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) मा. वित्त व लेखाधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६) मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
७) मा. प्र-कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
८) मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
९) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

स्वाक्षरीत/-
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## विद्यार्थी विकास

संचालक (का.) २४०३१३२
विद्यार्थी विकास २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : dsw@bamu.ac.in
dsd.office@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
मो. क्र. : ७५८८१६५२२१

संदर्भ /संविवि/२०२६-२७/७७०२-८१७५ दिनांक : २९.०७.२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
**मा. संचालक,**
उपपरिसर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**धाराशिव.**

**विषय : जिल्हा व केंद्रीय युवा महोत्सव २०२६-२७ बाबत...**

**महोदय / महोदया,**

आपणास कळविण्यात आनंद होतो की, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाचा जिल्हा युवा महोत्सव सोबतच्या नियमावलीमध्ये दिल्याप्रमाणे चार जिल्ह्यात दि. १ ते १२ सप्टेंबर २०२६ या दरम्यान १) धाराशिव जिल्हा- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव २) बीड जिल्हा- श्री. पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड ३) जालना जिल्हा- मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतूर, जि. जालना या संस्थेचे लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना ४) छत्रपती संभाजीनगर जिल्हा-शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. तद्नंतर केंद्रीय युवा महोत्सव दि. ०५ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात संपन्न होणार आहे. या महोत्सवातील सहभागी विद्यार्थी कलावंत, साथीदार व संघप्रमुखांच्या ऑनलाईन नोंदणीचा कालावधी दि. १ ते १७ ऑगस्ट २०२६ असून ऑनलाईन नोंदणी करतांना जिल्हास्तरीय व केंद्रीय युवा महोत्सवा अतंर्गत सादर होणाऱ्या सर्वच कलाप्रकारासाठी एकत्रित नोंदणी करावी. त्यानंतर प्रवेशिकेसोबत सर्व प्रपत्रे व आवश्यक कागदपत्र जोडून प्रवेशिकेची हार्ड कॉपी **दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागामध्ये** प्रत्यक्ष जमा करावी. यानंतर कोणत्याही प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**नोंदणीकरिता लिंक :** https://online.bamu.ac.in/unic/yuva26

सदरील जिल्हा युवा महोत्सवाचे वेळापत्रक आणि जिल्हास्तरीय महोत्सवाचे यजमान महाविद्याल यांचा समावेश नियमावलीमध्ये केला असून युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे.

धन्यवाद,

**सोबत:** १) नियम २) प्राचार्य/ संचालकाचे हमीपत्र
३) नमुना आय फॉर्म

**संचालक**
विद्यार्थी विकास मंडळ

**माहितीस्तव प्रत :**

१ स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२ स्वीय सहाय्यक, प्र-कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३ स्वीय सहाय्यक, कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४ संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५ जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

## छत्रपती संभाजीनगर

नॅक 'A+' दर्जा

## युवा महोत्सव २०२६-२०२७

### सुधारित महत्त्वाचे नियम

- प्रत्येक महाविद्यालयाने **किमान पाच कलाप्रकारात सहभाग घेऊन सादरीकरण करणे बंधनकारक आहे. यापैकी ३ वैयक्तिक कलाप्रकार व २ सांघिक कलाप्रकार सादर करणे अनिवार्य आहे.**
- **जर महाविद्यालयाने युवा महोत्सवात पाच कलाप्रकारात सादरीकरण केले नाही, तर महाविद्यालयास रू. १००००/- दंड + विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी युवा महोत्सव शीर्षकाखाली घेण्यात आलेले शुल्क विद्यापीठाकडे जमा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.**
- **प्रवेश शुल्क :**

  युवा महोत्सवामध्ये भाग घेण्यासाठी विद्यापीठाने खालीलप्रमाणे शुल्क निर्धारित केले आहे.

  **१. प्रत्येक सांघिक स्पर्धेकरिता - रू. ३००/-**

  **२. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेकरिता - रू. १५०/-**

  महाविद्यालयास जेवढ्या स्पर्धांमध्ये संघ पाठवायचा आहे त्यानुसार प्रवेश शुल्काची रक्कम **विद्यापीठास** Online भरणा करावी. सदरील पावती प्रवेश अर्जासोबत जोडावी.

  - प्रवेश शुल्काशिवाय कोणत्याही महाविद्यालयाच्या संघास स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही.
  - प्रवेश शुल्क व नोंदणी प्रक्रिया केवळ युवा महोत्सव २०२६-२०२७ च्या लिंकद्वारे पूर्ण केलेली असावी; अन्य कोणत्याही लिंकद्वारे केलेली नोंदणी व भरलेले शुल्क ग्राह्य नसेल.
  - **युवा महोत्सवाची नोंदणी केवळ आणि केवळ ऑनलाईन पद्धतीनेच** स्वीकारण्यात येणार आहे. नोंदणीकरिता लिंक https://online.bamu.ac.in/unic/yuva26
  - सांस्कृतिक समन्वयकांनी जिल्हा व केंद्रीय युवा महोत्सवाअंतर्गत सादर होणाऱ्या सर्वच कलाप्रकारांसाठी संघांची एकत्रित नोंदणी करायची आहे. मात्र जिल्हास्तरावर कोणत्याही कलाप्रकारात किमान पाच संघ सहभागी असतील तर स्पर्धा संपन्न होईल; नसता सदरील कलाप्रकाराची स्पर्धा विद्यापीठ स्तरावर घेण्यात येईल.
  - **महाविद्यालयाचा संलग्नीकरण आयडी (Affiliation ID) हा User Id असेल आणि पासवर्ड हा नोंदणी केल्यास नोंदणीकृत मोबाईल नंबरवर, संगणक स्क्रीनवर दिसेल शिवाय, एक टेक्स्ट फाईल डाउनलोड होईल.**

    जसे- Id: **EA00001** आणि Password: वरीलप्रमाणे प्राप्त होईल.

- **नोंदणी दि. १ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री १२.०० वा. पर्यंत सुरू राहील**. यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये नोंदणीस मुदतवाढ देण्यात येणार नाही.
- **ऑनलाईन भरलेले सर्व फॉर्म प्रिंट करून अत्यावश्यक स्वाक्षरी व कागदपत्रांसह (Hard Copy) दि. २२ ऑगस्ट २०२६** रोजी **सायं. ५.३० वा. पर्यंत** विद्यार्थी विकास विभाग कार्यालयात प्रत्यक्ष **जमा करणे बंधनकारक** आहे.
- **जिल्हा महोत्सवाच्या ठिकाणी कोणताही फॉर्म, हार्ड कॉपी स्वीकारली जाणार नाही.**
- नोंदणी फॉर्मसोबतची **सर्व प्रपत्रे भरणे अनिवार्य** आहे.
- कला सादरीकरणासंदर्भातील शेवटी जोडलेले **हमीपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह** Hard copy सोबत जमा करणे अनिवार्य आहे.
- **नाट्यसंहिते**संदर्भातील सेन्सॉर प्रमाणपत्रासाठी **नमुना-आय** फॉर्म **भरून** सांस्कृतिक कार्य संचालनालय, **रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबई** यांच्याकडे **नोंदणी शुल्क भरल्याची पावती** कला **सादरीकरणापूर्वी जमा करणे बंधनकारक** आहे.

## ➢ जिल्हास्तरीय युवा महोत्सव

| अ. क्र. | जिल्हा | यजमान महाविद्यालय | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | धाराशिव | **शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. धाराशिव** | दि. १ व २ सप्टेंबर २०२६ |
| २. | बीड | **श्री. पंडित गुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा, ता. परळी वै., जि. बीड** | दि. ४ व ५ सप्टेंबर २०२६ |
| ३. | जालना | लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय, परतूर व स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने<br>स्थळ : **लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय, परतूर, जि. जालना** | दि. ७ व ८ सप्टेंबर २०२६ |
| ४. | छत्रपती संभाजीनगर | **शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर** | दि. ११ व १२ सप्टेंबर २०२६ |
| | | **केंद्रीय युवा महोत्सव** | |
| १. | छत्रपती संभाजीनगर | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर** | दि. ५ ते ७ ऑक्टोबर २०२६* |

* या तारखांमध्ये काही अपरिहार्य परिस्थितीत बदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

## ➢ ऑनलाईन नोंदणीसाठी अत्यावश्यक कागदपत्रे व माहिती

- विद्यार्थ्याचा PRN क्रमांक.
- विद्यार्थ्यांचे जन्मतारीख असलेले दहावी बोर्ड प्रमाणपत्र-सनद (SSC Certificate)

- विद्यार्थ्यांचे आधार कार्ड (Students Aadhar Card)
- शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक (Last Exam/Sem. Marks Memo)
- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विद्यार्थ्यांची प्रवेश पावती (Students Admission Receipt)
- सांस्कृतिक समन्वयक/ संघव्यवस्थापकांचे नाव व अन्य माहिती (Cultural Coordinator/ Team Managers Name)
- विद्यार्थी व संघव्यवस्थापकांचे पासपोर्ट फोटो (फोटोच्या मागे नाव लिहावे.)

## ➢ फॉर्मसोबत प्रत्यक्ष सादर करावयाची अत्यावश्यक कागदपत्रे

- ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व सर्व प्रपत्रे (प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह)
- ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती-प्रिंट
- विद्यार्थ्यांचे **आधार कार्ड** व **महाविद्यालय ओळखपत्र**
- विद्यार्थी कलावंताचा **१ पासपोर्ट** फोटो (फोटोच्या मागे नाव लिहावे.)
- विद्यार्थ्यांचे जन्मतारीख असलेले **दहावी बोर्ड प्रमाणपत्र-सनद (SSC Certificate)**
- **शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक (Last Exam/Sem. Marks Memo)**
- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विद्यार्थ्यांची **प्रवेश पावती** सत्यप्रत
- प्राचार्यांचे कला सादरीकरणासंदर्भातील **हमीपत्र**
- नाट्य परिनिरीक्षण मंडळाकडे संहिता परीक्षणासाठी सादर केलेल्या **नमुना 'आय'**ची नोंदणी पावती
- संघव्यवस्थापकांचे **ओळखपत्र/आधारकार्ड**
- संघव्यवस्थापकांचे **१ पासपोर्ट** फोटो (फोटोच्या मागे नाव लिहावे.)

## ➢ महाविद्यालयांसाठी अत्यावश्यक सूचना

१. केवळ आपल्या महाविद्यालयात प्रवेश असलेल्या विद्यार्थी कलावंतांची युवा महोत्सवात नोंदणी करावी.

२. याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांचे PRN क्रमांक काळजीपूर्वक द्यावेत.

३. युवा महोत्सवात संलग्नित महाविद्यालयात प्रवेश नसलेल्या व्यावसायिक कलावंतांना सहभागी केल्याचे आढळून आल्यास कलाप्रकारांचे सादरीकरण बंद करून संघ/ महाविद्यालयावर बंदी घालण्यात येईल किंवा महाविद्यालयास आर्थिक दंड करण्यात येईल.

४. विद्यार्थी विकास मंडळ समितीच्या निर्णयानुसार महाविद्यालयांनी विद्यापीठास विद्यार्थी कलावंतांची चुकीची, खोटी वा अपूर्ण माहिती दिल्यास तसेच अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास संबंधित महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कठोर कारवाई**

**करण्यात येईल.** प्रसंगी महाविद्यालयाने विद्यापीठास चुकीची माहिती देऊन फसवणूक केल्याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच महाविद्यालयास प्रतिविद्यार्थी प्रमाणे आर्थिक दंड करण्यात येईल.

५. संघाचे गैरवर्तन/ शिस्तभंग/ सहभागी नसलेल्या कलावंताद्वारे सादरीकरण केल्यास याची संपूर्ण जबाबदारी प्रथम सांस्कृतिक समन्वयक / संघप्रमुख/ संघव्यवस्थापकांची आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.

६. स्पर्धेचे **व्हिडिओ चित्रीकरण व YouTube द्वारे थेट प्रक्षेपण** करण्यात येणार असल्याने केवळ आपल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचीच आपल्या महाविद्यालया अंतर्गत महोत्सवात नोंदणी करून सादरीकरण करावे.

७. केंद्रीय युवा महोत्सवात **सहभागी संघाच्या संपूर्ण अचूक माहितीची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.**

## ➢ स्पर्धकांची पात्रता

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागातील तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना युवा महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.
- विद्यार्थी कलावंत हा महाविद्यालयाचा पूर्णवेळ विद्यार्थी असावा.
- स्पर्धकाचे **वय ३० सप्टेंबर २०२६ या तारखेस २५ वर्षांपेक्षा कमी असावे.** वय वर्ष २५ व अधिक असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल.
- **केवळ नियमित, पूर्णवेळ विद्यार्थी** जे किमान एका शैक्षणिक वर्षाच्या कालावधीच्या पदवी किंवा पदव्युत्तर पदवीमध्ये प्रवेश घेतलेले आहेत आणि ज्यांची परीक्षा विद्यापीठाद्वारे १२वी परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर घेतली जाते, तेच पात्र ठरतील. **अशा विद्यार्थ्यांचा PRN व प्रवेश पावती अनिवार्य आहे.**
- **विद्यार्थी कलावंतांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे-**
  - विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालय / घटक महाविद्यालय / शैक्षणिक विभागाच्या प्रथम प्रवेशासाठी पात्र ठरविणारी परीक्षा उत्तीर्ण केल्यापासून ७ वर्षांहून अधिक काळ गेलेला नसावा.
  - तसेच, विद्यार्थी आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या नियमित कालावधीपेक्षा **एक वर्ष अधिक** कालावधीपर्यंत सहभागी होऊ शकतात.

    **स्पष्टीकरण** –

    तीन वर्षांच्या शैक्षणिक पदवीस (उदा. बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम.) शिकणारे विद्यार्थी प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यापासून चार वर्षे सहभागी होऊ शकतात, तर चार वर्षांच्या अभ्यासक्रमांचे (उदा. बी.ई., बी.टेक.) विद्यार्थी पाच वर्षे सहभागी होऊ शकतात.

- विद्यार्थी एका शैक्षणिक वर्षात एकापेक्षा अधिक महाविद्यालय/संघाचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत.
- विद्यापीठ/ महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश घेतलेला विद्यार्थी पात्र मानला जाणार नाही.
- विद्यार्थ्याने एका विभाग/ महाविद्यालयातून दुसऱ्या विभाग/ महाविद्यालयात स्थलांतर केल्यास, नवीन विभाग/ महाविद्यालयात नियमित प्रवेश घेतल्यानंतरच तो पात्र असेल.

➢ **अपात्रता - पात्रतेचे नियम भंग केल्याबद्दल**

विद्यार्थ्याने पात्रतेच्या अटींचे उल्लंघन केल्यास, तो स्पर्धक तीन शैक्षणिक वर्षांसाठी (चालू शैक्षणिक वर्षासह) नैसर्गिकरीत्या अपात्र ठरेल.

**अत्यंत महत्त्वाचे : आपल्या सुरक्षेसाठी सर्व रंगमंच व भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी CCTV कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.**

## ➢ सामान्य मार्गदर्शक तत्त्वे व नियमावली

### १. संघाची क्षमता (Team Contingent)

- प्रत्येक महाविद्यालयातून संघाची जास्तीत जास्त संख्या ४५ असेल.
- साथी कलाकार (Accompanists) शक्यतो विद्यार्थीच असावेत, साथी कलावंत विद्यार्थी असल्यास त्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
- योग्य विद्यार्थी उपलब्ध नसल्यास साथी कलाकार म्हणून बाहेरच्या व्यक्तींना परवानगी आहे, त्यांची संपूर्ण जबाबदारी सांस्कृतिक समन्वयक/संघ व्यवस्थापक व महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.
- **कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त व्यक्तींना निवास व अन्य बाबींकरिता मान्यता दिली जाणार नाही.**

### २. स्वरूप

| विवरण | संख्या |
|---|---|
| विद्यार्थी कलावंत साथी कलाकारांसह | ४३ |
| संघव्यवस्थापक (पुरूष) | ०१ |
| संघव्यवस्थापक (स्त्री) | ०१ |
| **एकूण** | **४५** |

### ३. संघप्रमुख

- स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाने **जास्तीत जास्त दोन व्यक्ती** संघप्रमुख/ संघ व्यवस्थापक म्हणून नियुक्त कराव्यात. यापैकी **एक सांस्कृतिक समन्वयक** असणे अनिवार्य आहे.
- संघप्रमुखांचे ओळखपत्र सोबत असावे.
- हे प्रमुख महोत्सव आयोजन समितीसोबत समन्वय साधतील.

- संघाचे गैरवर्तन/ शिस्तभंग/ सहभागी नसलेल्या कलावंताद्वारे सादरीकरण केल्यास याची संपूर्ण जबाबदारी सांस्कृतिक समन्वयक/ संघप्रमुख/ संघव्यवस्थापकांची असेल. तसेच यासंदर्भाने **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार होणाऱ्या कारवाईस संघव्यवस्थापकांना सामोरे जावे लागेल.** प्रसंगी संघप्रमुखांना आर्थिक दंड करण्यात येईल.
- संघातील विद्यार्थीनींसोबत महिला संघव्यवस्थापक / संघप्रमुख अनिवार्य आहे.
- **संघप्रमुखांनी पूर्णवेळ आपल्या संघासोबत युवा महोत्सव संपन्न होत असलेल्या परिसरात थांबणे** बंधनकारक आहे.

## ४. ओळखपत्र

प्रत्येक सहभागी विद्यार्थी कलावंतांकडे व संघप्रमुखांकडे संबंधित महाविद्यालयाचे अधिकृत **ओळखपत्र** असावे. तसेच महोत्सवादरम्यान महोत्सवाकरिता विद्यापीठाद्वारे देण्यात आलेले ओळखपत्र प्रत्येकाने सोबत बाळगणे व कला सादरीकरणापूर्वी जमा करणे अनिवार्य आहे.

## ५. प्रवास आणि प्रवासादरम्यान अन्न खर्च

- **प्रवास खर्च** : सहभागी महाविद्यालयाने संघाचा महाविद्यालय ते यजमान महाविद्यालय/ विद्यापीठापर्यंतचा प्रवास खर्च स्वत: करावा.
- **अन्न खर्च** : प्रवासादरम्यान संघाचा नाश्ता व जेवणाचा खर्चदेखील सहभागी महाविद्यालयाने करावा.

## ६. भोजन व्यवस्था

महोत्सव आयोजकांकडून युवा महोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवशी दुपारच्या जेवणापर्यंत चहा, नाश्ता, भोजन उपलब्ध करून दिले जाईल. संघव्यवस्थापकांनी स्वत: पैसे भरून आपल्या संघातील सदस्यांचे कुपन खरेदी करून चहा, नाश्ता, भोजन घ्यावे.

## ७. निवास आणि भोजन

- महोत्सव आयोजित करणाऱ्या यजमान महाविद्यालयापासून २५ किमी पेक्षा अधिक अंतर असलेल्या संघाचीच **मागणीनुसार निवास व्यवस्था** करण्यात येईल.
- महोत्सवाच्या कालावधीत विद्यार्थी कलावंत व संघप्रमुखांसाठी महाविद्यालय/ विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी वसतिगृह, सामूहिक कक्ष, शैक्षणिक विभाग, हॉल इत्यादी ठिकाणी **विनामूल्य निवासाची व्यवस्था** असेल.
- याकरिता रू. ५००/- रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात येईल. ती रक्ककम महोत्सव संपल्यानंतर संघ परत जाताना मिळेल.
- अंथरण्याकरिता सतरंजी/मॅटची व्यवस्था आयोजकांकडून करण्यात येईल.

## ८. कपडे

सद्य:स्थितीतील पाऊस व बदलते वातावरण लक्षात घेता, विद्यार्थी कलावंत व संघव्यवस्थापकांनी **पावसापासून सुरक्षेसाठीची साधने (रेनकोट/छत्री इ.), गरम अंथरून-पांघरूण, ब्लँकेट्स, लोकरीचे कपडे, स्वेटर, अत्यावश्यक औषधी, कुलूप इत्यादी** सोबत आणणे अनिवार्य आहे.

## ९. लसीकरण

सर्व सहभागी विद्यार्थी कलावंत आणि संघव्यवस्थापकांनी **कोविड, कॉलरा, टायफॉइड इत्यादी रोगांसाठी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे.**

## १०.शिस्त

i. जर कोणत्याही संघाचे वर्तन युवा महोत्सवाच्या उद्दिष्ट वा नियमांच्या विरोधी आढळले, तर **विद्यापीठाद्वारे सदस्य / संघावर कठोर कारवाई करण्यात येईल**, तसेच **संबंधित व्यक्ती / संघाला तीन शैक्षणिक वर्षांसाठी अपात्र** ठरवले जाईल.

ii. **विवादास्पद विषयांवर** कोणत्याही संघप्रमुखांनी किंवा संघ सदस्यांनी विद्यापीठाची/ आयोजक संस्थेची प्रतिमा मलीन होईल याप्रकारे **कृती करू नये.**

iii. मद्यपान, छेडछाड, परीक्षकांवर प्रभाव टाकणे, अयोग्य वर्तन **कठोरपणे निषिद्ध आहे.**

iv. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या **संघाला निलंबित करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल.**

v. संघातील शिस्त राखण्याची जबाबदारी सांस्कृतिक समन्वयक/ संघप्रमुखांची असेल.

vi. कोणत्याही शिस्तभंगाच्या घटनेत, संघप्रमुखाने तात्काळ **संचालक, विद्यार्थी विकास** यांना माहिती द्यावी.

vii. गंभीर प्रकरणे **निरीक्षक समिती, सल्लागार समिती** आणि **मा. कुलगुरू महोदयांच्या निदर्शनास आणली जातील.**

viii. सर्व सहभागी संघांनी विद्यापीठ प्रशासन तसेच आयोजक महाविद्यालयाने दिलेल्या **सर्व सूचना काटेकोरपणे पाळणे बंधनकारक आहे.**

## ११. स्पर्धेसंबंधीचे इतर नियम

- **प्रत्येक कलाप्रकार सादरीकरणापूर्वी विद्यापीठाद्वारे युवा महोत्सवाची दिलेली ओळखपत्रे त्या-त्या स्टेजच्या रिपोर्टिंग प्रमुखांकडे जमा करणे अनिवार्य आहे.**
- महोत्सवात फटाके किंवा शस्त्रास्त्रांचा वापर सक्तपणे प्रतिबंधित आहे. तथापि, सांस्कृतिक सादरीकरणासाठी आवश्यक असल्यास, महोत्सव आयोजकांची पूर्व परवानगी घेऊन त्यांची प्रतिकृती वापरता येईल.
- महाविद्यालय/विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या निवास व्यवस्थेचा वापर करणाऱ्या प्रत्येक संघ प्रमुखांनी संघ महोत्सव ठिकाणी आल्याची नोंद (Reporting) करावी.

- समन्वयकांनी महोत्सवस्थळी **नोंदणीच्या वेळी रु. ५००/- रक्कम परतफेड योग्य अनामत रक्कम** म्हणून जमा करावी. दिलेल्या वस्तूंच्या किंवा मालमत्तेच्या नुकसानीसाठी ही रक्कम कपात केली जाईल. त्यापेक्षा अधिक नुकसान केल्याचे/झाल्याचे लक्षात आल्यास संबंधित आयोजकांकडून रीतसर पत्र देऊन सदरील रक्कम वसूल करण्यात येईल.
- संघातील विद्यार्थी कलावंत, सदस्यांनी गैरवर्तणूक केल्यास त्यांच्यावर, संघावर, महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६** नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी आवश्यक पोस्टर, रंग, ब्रश इ. साहित्य, संगीत, वाद्ये, मूकअभिनय, प्रहसनसाठी लागणारे साहित्य, विद्यार्थी कलावंत, साथीदार संघाने सोबत आणावे. (अशी साधने आयोजकांद्वारे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.) तसेच उपरोक्त कारणांमुळे संघाला सादरीकरण करता आले नाही वा संघ बाद झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची असेल.
- प्रत्येक कलाप्रकाराकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन पारितोषिके देण्यात येतील.
- परीक्षकांनी दिलेले निर्णय अंतिम असून सर्व स्पर्धकांवर, संघावर ते बंधनकारक राहतील.
- **उत्कृष्ट संघ पुरस्कार हा केवळ केंद्रीय महोत्सवात देण्यात येईल.**
- **ग्रामीण संघासाठीचा उत्कृष्ट संघ (चॅम्पीयनशिप) पुरस्कार ग्रामपंचायत/नगरपरिषद** असलेल्या ठिकाणच्या महाविद्यालयास देण्यात येईल.
- स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्येक कलाप्रकाराच्या सादरीकरणासाठी कोड क्रमांकानुसार रिपोर्टिंगची घोषणा झाल्याच्या १० ते १५ मिनिटांत रिपोर्टिंग करावे.
- **तीन वेळा संघाचा क्रमांक घोषित करण्यात येईल, तिसऱ्या कॉलनंतर संघ बाद करण्यात येईल.**
- **कोणत्याही संघाने नियोजित वेळी रिपोर्टिंग, सादरीकरण केले नाही वा सादरीकरणास टाळाटाळ/दिरंगाई केल्यास ३० मिनिटांच्या अवधीनंतर संबंधित संघास ५०० रू. दंड आकारण्यात येईल.** याची जबाबदारी सांस्कृतिक समन्वयकांची असेल.

## १२.कला प्रकार – जिल्हा युवा महोत्सव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारे **जिल्हा युवा महोत्सवा**करिता संगीत, नृत्य, नाट्य, ललित कला व वाङ्मय या **पाच गटात २८ कलाप्रकारांत स्पर्धा** आयोजित केल्या आहेत-

### I. संगीत विभाग-Music Section

१. भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक)_ Indian Classical Vocal (Solo)
२. भारतीय शास्त्रीय तालवाद्य (वैयक्तिक) _ Indian Classical Instrumental Percussion_ Taalvadya (Solo)
३. भारतीय शास्त्रीय सुरवाद्य (वैयक्तिक)_ Indian Classical Instrumental Non-Percussion_ Survadya (Solo)
४. नाट्यसंगीत (वैयक्तिक) Natyasangeet Vocal (Solo)

५. भारतीय सुगम गायन (वैयक्तिक)_ Indian Light Vocal (Solo)
६. भारतीय समूह गायन (सांघिक)_ Indian Group Song (Group)
७. लोक वाद्य वृंद (सांघिक)_ Folk Orchestra (Group)
८. पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक)_ Western Vocal (Solo)
९. पाश्चात्य वाद्य वादन _Western Instrumental (Solo)
१०. पाश्चात्य समूह गायन (सांघिक)_ Western Group Song (Group)

## II. नृत्य विभाग_Dance Section

११. भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक)_ Indian Classical Dance (Individual)
१२. लोक आदिवासी नृत्य (सांघिक)_ Indian Folk Dance (Group)

## III. वाङ्मय विभाग_Literary Section

१३. वक्तृत्व (वैयक्तिक)_Elocution (Individual)
१४. वादविवाद (सांघिक)_ Debate (Group)
१५. प्रश्नमंजुषा (सांघिक)_ Quiz (Group)

## IV. नाट्य विभाग_Theatre Section

१६. नकला (वैयक्तिक)_Mimicry (Individual)
१७. एकांकिका – मराठी/हिंदी (सांघिक)_ One Act Play-Marathi/Hindi (Group)
१८. प्रहसन (सांघिक)_Skit (Group)
१९. मूक अभिनय (सांघिक)_ Mime (Group)

## V. ललित कला विभाग_Fine Arts Section

२०. रांगोळी (वैयक्तिक)_ Rangoli (Individual)
२१.चित्रकला (वैयक्तिक)_ Painting (Individual)
२२. कोलाज (वैयक्तिक)_ Collage (Individual)
२३. पोस्टर (वैयक्तिक)_ Poster Making (Individual)
२४. मृदमूर्तीकला (वैयक्तिक)_ Clay Modeling (Individual)
२५. व्यंगचित्र (वैयक्तिक)_ Cartooning (Individual)
२६. स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक)_ Spot Photography (Individual)
२७. इन्स्टॉलेशन_Installation (Group)
२८. लघुपट (समूह)_Short Film (Group)

याशिवाय,

उद्घाटन समारंभापूर्वी **शोभायात्रा_(Procession)** ही सांघिक स्पर्धा होईल. शोभायात्रेचा समावेश कलाप्रकारामध्ये नसल्यामुळे याची प्रोत्साहनपर स्पर्धा केवळ जिल्हास्तरावर होईल. (**सूचना :** ज्या संघांना शोभायात्रेत सहभाग घ्यायचा आहे, त्यांनी शोभायात्रेकरिता ऑनलाईन नोंदणी करावी.)

सूचना : जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय प्रावीण्य संपादन करणारे संघ केंद्रीय युवा महोत्सवात सहभागी होतील.

## १३. स्पर्धा संचालन नियम

### I. संगीत विभाग

#### i. भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. सादरीकरण केवळ **हिंदुस्थानी** किंवा **कर्नाटकी शैलीत** करावे.
३. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.
४. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच सुरू होईल.
५. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.
६. वाद्यवृंद साथीदार कलाकारांची संख्या **कमाल २** असेल.
७. चित्रपट गीते सादरीकरणास अनुमती नाही.
८. सहभागी विद्यार्थी कलावंतांनी स्वतःची वाद्ये आणावी.
९. मूल्यांकन प्राधान्याने **राग निवड, स्वरलगाव, राग शुद्धता व रागविस्तार, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

#### ii. भारतीय शास्त्रीय तालवाद्य (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. सादरीकरण केवळ **हिंदुस्थानी** किंवा **कर्नाटकी शैलीत** करावे.
३. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.
४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.
५. **साथी कलाकारांची संख्या केवळ** २ असेल.
६. सहभागी विद्यार्थी कलावंतांनी स्वत: स्वतःची वाद्ये आणावी.
७. मूल्यांकन प्राधान्याने **ताल निवड, उपज अंग, समेची अचूकता, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

#### iii. भारतीय शास्त्रीय सुरवाद्य (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. सादरीकरण **हिंदुस्थानी** किंवा **कर्नाटकी शैलीत** करावे.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.
४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.
५. **फक्त १ साथी कलाकाराला** परवानगी असेल.
६. सहभागी विद्यार्थी कलावंतांनी स्वत: स्वतःची वाद्ये आणावी.
७. कॅसिओच्या वापरास परवानगी नाही; मात्र हार्मोनिअम, व्हायोलिन, सारंगी, बासरी, संतूर, रूद्रवीणा या भारतीय शास्त्रीय संगीतात वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांचा वापर करता येईल.
८. मूल्यांकन प्राधान्याने **स्वर, ताल, राग निवड, वादन कौशल्य** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv. नाट्यसंगीत (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **केवळ १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.
२. विद्यार्थी भारतातील कोणत्याही **नाट्यप्रकारातील गाणे / नाट्यपद** सादर करेल.
३. गाणे / नाट्यपद हे नाट्यगीत शैलीतील असावे. इतर प्रकारची गाणी (ओवी किंवा भावगीत) नाट्यगीत म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
४. सादरीकरणाची **वेळ किमान ५ मिनिटे व कमाल ७ मिनिटे** असेल.
५. आयोजकांकडून अंतिम घोषणा झाल्यानंतर लगेच वेळेची गणना सुरू होईल.
६. रंगमंच / वाद्ये लावण्यासाठीची वेळ कमाल ३ मिनिटे असेल.
७. साथी कलावंतांची **कमाल संख्या २** असेल.
८. चित्रपटातील नाट्यपद या स्पर्धेत मान्य असेल.
९. मूल्यमापन प्राधान्याने **सूर, ताल, राग निवड, भावदर्शन व नाट्यांग, एकूण प्रभाव** या गुणांवर आधारित असेल.

### v. भारतीय सुगम गायन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते जास्तीत जास्त ६ मिनिटे** असेल.
३. गीत/ गजल/ भजन/ शब्द/ अभंग/ भावगीत इत्यादींचा समावेश असावा.
४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.
५. साथी कलाकारांची संख्या **कमाल २** असेल.
६. या स्पर्धेत चित्रपट गीते सादर करण्यास परवानगी नाही.
७. मूल्यांकन प्राधान्याने **स्वर, ताल, भावदर्शन, रागाची निवड** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## vi. भारतीय समूह गायन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४ आणि कमाल ६ विद्यार्थ्यांचा संघ** असेल.
२. समुहाने **एक देशभक्ती गीत** आणि **एक भारतीय लोकगीत** सादर करावे.
३. गीते भारतातील कोणत्याही प्रादेशिक किंवा अधिकृत भाषेत असू शकतात.
४. दोन्ही गाण्यांसाठी सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.
५. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ५ मिनिटे** दिली जातील.
६. **साथी कलाकारांची संख्या कमाल ३** असेल.
७. गायक वाद्ये वाजवू शकतात.
८. या स्पर्धेत चित्रपट गीते सादरीकरणास परवानगी नाही.
९. मूल्यांकन प्राधान्याने **संगीत रचना, गीताची निवड, समन्वय, गीताचा दर्जा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल; संघाची रंगभूषा, वेशभूषा आणि कृतींवर गुणदान आधारित नसेल.

## vii. लोक वाद्य वृंद (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाचा **किमान ६ आणि कमाल ९ विद्यार्थ्यांचा एक संघ** असेल.
२. संघ फक्त विद्यार्थी/विद्यार्थीनी किंवा एकत्र विद्यार्थ्यांचा असू शकतो.
३. सादरीकरणाची **वेळ किमान ८ मिनिटे आणि जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.
४. आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच वेळ गणनास सुरुवात होईल. या वेळेमध्ये वाद्य व्यवस्था/ध्वनी व्यवस्था करण्यासाठी लागणारा वेळ समाविष्ट केला जाणार नाही.
५. सादरीकरणापूर्वी **वाद्य व्यवस्था/ध्वनी व्यवस्था** करण्यासाठी अतिरिक्त **१० मिनिटे** दिली जातील.
६. **जास्तीत जास्त ३ साथसंगतकारांना परवानगी** असेल. ते साथीदार सहभागींपेक्षा वेगळ्या पोशाखात असतील, जेणेकरून ते सहज ओळखता येतील. या तीन व्यवसायिक कलावंताची माहिती पासपोर्ट साईज फोटोसहीत युवा महोत्सवाच्या आयोजन समितीकडे देणे बंधनकारक राहील.
७. साथसंगतकार स्वतंत्रपणे बसतील/उभे राहतील आणि संघाचे नेतृत्व करणार नाहीत.
८. संघाने **महाराष्ट्रातील मूळ लोकसंगीताचे सादरीकरण** करावे. सादरीकरणात वाजवली जाणारी वाद्ये विशिष्ट लोककलेशी संबंधित आणि त्या लोककलांसाठी मूळ स्वरूपाची असावीत.
९. **चित्रपटांमध्ये वापरलेले लोकसंगीत** या स्पर्धेत सादरीकरणयोग्य असणार नाही.
१०. वाद्यांमध्ये **पाश्चात्य किंवा अभिजात वाद्यां**चा अंतर्भाव असू नये. तसेच इलेक्ट्रॉनिक वाद्यांच्या वापरास बंदी आहे.
११. मूल्यांकन प्राधान्याने **अस्सलपणा, वाद्यांची निवड, वाद्यमेळ व समन्वय, सांगीतिक रचना व कल्पकता** आणि **वैविध्यावर** आधारित असेल; संघाची रंगभूषा, वेशभूषा आणि कृतींवर नाही.

## viii. पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाचा **फक्त १ विद्यार्थी सहभागी** होईल.

२. विद्यार्थी फक्त **इंग्रजी भाषेत गाणे** सादर करेल.

३. विद्यार्थी कितीही गाणी सादर करू शकतो; **गाण्यांची संख्या मर्यादित** नाही.

४. सादरीकरणाची वेळ **किमान ४ आणि कमाल ६ मिनिटे** असेल.

५. वेळ गणना आयोजकांनी अंतिम घोषणा केल्यानंतर त्वरित सुरू होईल.

६. स्टेज/वाद्य व्यवस्था करण्यासाठी **किमान ३ मिनिटे वेळ** दिला जाईल.

७. साथी कलावंतांची **कमाल संख्या २** असावी.

८. विद्यार्थी/साथीदार सादरीकरणादरम्यान सिंथेसायझर किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक साधन वापरू शकतात.

९. यामध्ये चित्रपट गाणी सादर करता येतील.

१०. मूल्यांकन **गाण्याची निवड, स्वर, ताल, लय, शब्दोच्चार आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### ix. पाश्चात्य वाद्य वृंद (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **केवळ १ विद्यार्थी** सहभागी होईल.

२. सहभागी विद्यार्थी कोणत्याही पाश्चात्य तालवाद्य किंवा अतालवाद्यावर पाश्चात्य संगीत सादर करेल.

३. सादरीकरणाची **वेळ किमान ५ मिनिटे व कमाल ७ मिनिटे** असेल.

४. आयोजकांकडून अंतिम घोषणा झाल्यानंतर लगेच वेळेची गणना सुरू होईल.

५. रंगमंच / वाद्ये लावण्यासाठीची वेळ कमाल ३ मिनिटे असेल.

६. साथसंगत करणाऱ्यांची **कमाल संख्या २** असेल.

७. सहभागी विद्यार्थी कोणत्याही एका प्रकार/शैलीत किंवा विविध पाश्चात्य प्रकार/शैलींचा संगम करून सादरीकरण करू शकतो.

८. सादरीकरणादरम्यान साथसंगतकार सिंथेसायझर किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक वाद्य वापरू शकतात.

९. मूल्यमापन प्राधान्याने **वाद्यमेळ, लय, स्वर-सामंजस्य, सांगीतिक रचना व पाश्चात्य शैली, समन्वय** आणि **एकूण प्रभाव** या गुणांवर आधारित असेल.

### x. पाश्चात्य समूह गायन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४ आणि जास्तीत जास्त ६ विद्यार्थ्यांचा** संघ असेल.

२. संघ केवळ **इंग्रजी भाषेत गाणी** सादर करेल.

३. संघ कोणतेही गाणे सादर करू शकतो; गाण्यांच्या संख्येवर कोणतीही मर्यादा नाही.

४. गाण्यांसह संपूर्ण सादरीकरणाचा कालावधी **किमान ८ आणि जास्तीत जास्त १० मिनिटां**चा असेल.

५. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच सुरू होईल.

६. स्टेज किंवा वाद्य व्यवस्था करण्यासाठी **जास्तीत जास्त ५ मिनिटांचा** वेळ दिला जाईल.

७. **साथी कलावंतांची जास्तीत जास्त संख्या ३** असेल. मात्र, गायक गाण्याच्या वेळी पाश्चात्य वाद्य वाजवू शकतात.

८. या स्पर्धेत **चित्रपट गाणी** सादर करता येतील.

९. मूल्यांकन **गाण्यांची निवड, हार्मनी व आवाज समन्वय, डायनॅमिक्स व सांगीतिक रचना गायनाची गुणवत्ता, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल; संघाची रंगभूषा, वेशभूषा आणि कृतींवर गुणदान आधारित नसेल.

## II) नृत्य विभाग

### i. भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून फक्त **१ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.

२. शास्त्रीय नृत्य **कथक, कथकली, भरतनाट्यम, मणिपुरी, कुचिपुडी, मोहिनीयाट्टम किंवा ओडिसी** या भारतीय शास्त्रीय नृत्य प्रकारांपैकी असावे.

३. सादरीकरणाची एकूण वेळ **किमान १२ मिनिटे आणि जास्तीत जास्त १५ मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच सुरू होईल.

४. **मंच/वाद्य व्यवस्था** करण्यासाठी जास्तीत जास्त **३ मिनिटे** दिली जातील.

५. साथी कलाकारांची संख्या **कमाल ३** असेल.

६. चित्रपटांतील शास्त्रीय शैलीतील नृत्य या स्पर्धेत सादर करता येणार नाही.

७. **नृत्यातील गोष्टींची माहिती असेल तर आणि नृत्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गीतांचे मराठी/हिंदी भाषेत अर्थ लिहून चार प्रतीत द्यावे**. यावर केवळ संघ संकेतांक असावा. संघाची ओळख पटवणारी खुण वा माहिती असेल तर संबंधित संघ बाद ठरविण्यात येईल.

८. मूल्यांकन **तंत्र व ताल, भावदर्शन व अभिनय, अंगशुद्धी व हस्तमुद्रा, वेशभुषा, पार्श्वसंगीत, पदन्यास** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### ii. भारतीय लोक/आदिवासी नृत्य (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ८ आणि कमाल १० विद्यार्थ्यांचा एक संघ** असेल.

२. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.

३. साथी कलाकारांची संख्या **जास्तीत जास्त ५** असेल.

४. नृत्य **मूलभूत भारतीय आदिवासी किंवा लोकनृत्य प्रकारचे** असावे; ते शास्त्रीय नृत्य नसावे.

५. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ५ मिनिटे** दिली जातील.

६. सादरीकरणानंतर **२ मिनिटांत सर्व साहित्य/वाद्ये काढणे आवश्यक** असेल. संघाकडून झालेला कचरा संघाने स्वत: साफ करावा.

७. सहभागी संघांनी रंगमंचावर लावलेले नेपथ्य, केलेली सजावट स्वत: काढावी.

८. चित्रपटातील लोकनृत्ये सादर करता येणार नाहीत.

९. सादरीकरणादरम्यान रेकॉर्डेड संगीत उपयोजता येणार नाही.

१०.**नृत्य संहिता** (जसे- गीताचे बोल, शब्द) **आणि विषय चार प्रतीत देणे बंधनकारक आहे.** ज्यावर संघाचा कोड क्रमांक लिहिलेला असेल. त्यावर महाविद्यालयासंबंधीची कोणतीही खुण वा ओळख पटणारी माहिती लिहिलेली आढळल्यास संबंधित संघ बाद ठरविण्यात येईल.

११.मूल्यांकन प्राधान्याने **अस्सलपणा व पारंपरिक बाज, संगीत, ताल, रचना, अभिनय, पोशाख, हावभाव, देहबोली व ऊर्जा, रंगभूषा, नेपथ्य, सजावट** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

१२.कोणत्याही संघास ज्वलनशील पदार्थांच्या वापरास परवानगी नाही. ज्वलनशील पदार्थ रंगमंचावर आणू नयेत, आणल्यास त्या संघाचे सादरीकरण थांबवण्यात येईल.

## III) वाङ्मय विभाग

### i. वक्तृत्व (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **केवळ १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.

२. सादरीकरणाचे माध्यम **मराठी, हिंदी किंवा इंग्रजी** असेल.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते कमाल ५ मिनिटे** असेल.

४. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर सुरू होईल.

५. वक्तृत्व **स्पर्धेसाठीचा विषय संघ प्रमुखांच्या बैठकीत** जाहीर केला जाईल.

६. सादरीकरण **गद्य स्वरूपात असावे;** काव्य किंवा गाणे अमान्य असेल.

७. कोणत्याही प्रकारची **चिठ्ठी/कागद** सोबत ठेवता येणार **नाही.**

८. मूल्यांकन प्राधान्याने **प्रारंभ, विषय मांडणी व आशयघनता, देहबोली व आत्मविश्वास, भाषाप्रभुत्व व भाषाशैली, प्रतिसाद आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### ii. वादविवाद (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **२ विद्यार्थ्यांचा एक संघ** सहभागी होऊ शकेल.

२. वादविवादासाठीचा विषय **संघ प्रमुखांच्या बैठकीत जाहीर केला जाईल.**

३. प्रत्येक विद्यार्थ्याला बोलण्यासाठी **किमान ४ ते कमाल ५ मिनिटे** दिली जातील.

४. संघातील एक स्पर्धक **विषयाच्या बाजूने** मांडणी करेल आणि आणि दुसरा स्पर्धक विषयाच्या **विरोधात** बोलेल.

५. दोन्ही विद्यार्थी **मराठी, हिंदी किंवा इंग्रजी** भाषेत भाषण करू शकतात. विद्यार्थी एकाच भाषेत किंवा वेगवेगळ्या भाषेत बोलू शकतात.

६. **प्रथम बोलणाऱ्या स्पर्धकासाठी खंडन करण्यास स्पर्धेशेवटी २ मि. वेळ** देण्यात येईल.

७. भाषण करताना **कोणत्याही प्रकारच्या चिठ्ठी/कागदाचा आधार घेता येणार नाही.**

८. सादरीकरणासाठी सहभागी स्पर्धकांचे लॉट्स काढून त्यांना भाषणासाठी पाचारण करण्यात येईल.

९. मूल्यांकन प्राधान्याने **प्रारंभ, आशय, तर्कशुद्ध युक्तिवाद, खंडण-मंडण व प्रतिवाद, भाषाप्रभुत्व व शैली, देहबोली व आत्मविश्वास** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii. प्रश्नमंजुषा (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **३ विद्यार्थ्यांचा एक संघ** सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी** अशा दोन टप्प्यांत आयोजित केली जाईल.

३. प्राथमिक फेरीत लेखी परीक्षा होईल. प्राथमिक फेरीतून **कमाल ५ संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील.**

४. सर्व प्रश्न **मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेत** असतील आणि **लेखी परीक्षेसाठी ३० मिनिटे** दिली जातील.

५. तोंडी स्पर्धेपूर्वी विविध राउंडसची माहिती/ प्रकार, उत्तर देण्यासाठीचा वेळ आणि चाचणीसाठी असलेले गुण इ. माहिती दिली जाईल.

६. अंतिम फेरीत **तोंडी आणि ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात प्रश्न विचारले जातील.**

७. मूल्यांकन प्राधान्याने **अचूक उत्तर संख्या, गती, प्रणाली, उत्तर देण्याची वेळ** यानुसार होईल.

## IV नाट्य विभाग

### i. मिमिक्री/नकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.

२. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते जास्तीत जास्त ५ मिनिटे** असेल.

३. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर सुरू होईल.

४. सहभागी **मशीन/व्यक्तींचे आवाज तसेच प्रसिद्ध व्यक्तींची भाषणे** यांची नक्कल करू शकतो.

५. मंचावर सादरीकरण करावयाच्या पात्राचे नाव जाहीर करण्यास परवानगी असेल.

६. मूल्यांकन प्राधान्याने **मध्यवर्ती कल्पना, अभिनय, वेशभुषा व रंगभुषा, नक्कल कौशल्य, देहबोली व हावभाव, आवाजातील वैविध्य व आवाजाचा पोत, सादरीकरण शैली** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### ii. एकांकिका (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान २** आणि **कमाल ९ कलावंतांचा** संघ असेल.

२. साथी कलाकारांची संख्या **कमाल ३** असेल.

३. सादरीकरणाची वेळ **किमान २५ ते जास्तीत जास्त ३० मिनिटे** असेल.

४. वेळ गणना घोषणा सुरू होताच किंवा पडदा पूर्णपणे उघडल्यानंतर सुरू होईल, यापैकी जे अगोदर होईल त्यानुसार वेळ गणना होईल.

५. सर्व सजावट, नेपथ्य, प्रकाश योजना, ध्वनीयंत्रणा, रंगमंच व्यवस्था/प्रकाश योजना करण्यासाठी नाटकाच्या आधी **१० मिनिटे** दिली जातील. ही १० (दहा) मिनिटे रंगमंच ताब्यात घेतल्यापासून धरण्यात येतील.

६. नाटक संपल्यानंतर **५ मिनिटे** रंगमंचावर नेपथ्य व अन्य साहित्य काढण्यासाठी दिले जातील. रंगमच जसे ताब्यात दिले तसेच परत करावे.

७. सहभागी संघाने आपला सेट, मंच साहित्य, मेकअप साहित्य इत्यादी स्वतः आणावे.

८. विद्यापीठ/आयोजकाद्वारे जनरल लाईट व आठ स्पॉट लाईट आणि डिमरची व्यवस्था करण्यात येईल. अतिरिक्त लागणारे लाईट्स संघानी स्वतः आणावेत आणि त्यास लागणारे साहित्य स्वतः उपलब्ध करुन घ्यावे.
९. एकांकिकेचा **दिग्दर्शक** हा महाविद्यालयाचा विद्यार्थी असावा व **तांत्रिक बाजूसाठी विद्यार्थी कलावंत** व शिक्षक असावेत ज्याची संख्या ३ पेक्षा जास्त असू नये.
१०. एकांकिकेच्या लेखकाचे सादरीकरणासाठीचे परवानगी पत्र, संहिता आणि पात्र परिचय विद्यापीठ युवा महोत्सव आयोजन समितीकडे चार प्रतीत सादर करावे. **सोबत- नमुना 'आय' जोडले** असून एकांकिकेच्या परवानगीसाठी सदर फॉर्म भरून रंगभूमी परिनिरीक्षण मंडळास पाठवून परवानगी घ्यावी आणि रंगभूमी परिनिरीक्षण मंडळास शुल्क भरल्याचा पुरावा सादर करावा.
११. नाटक गद्य किंवा पद्य स्वरूपात असावे.
१२. आवश्यक परवानग्या, सेन्सॉर प्रमाणपत्रे इत्यादी घेण्याची जबाबदारी सहभागी महाविद्यालय / सांस्कृतिक समन्वयक / संघप्रमुखांची असेल.
१३. एकांकिका संपल्यानंतर संबंधित एकांकिकेच्या दिग्दर्शकास परीक्षकांनी चर्चेसाठी बोलविल्यास एकट्यानेच हजर व्हावे, अन्य कलावंत व शिक्षकांना सोबत नेऊ नये.
१४. सहभागी संघांनी व संघ प्रमुखांनी संबधित ठिकाणी एकांकिका सादरीकरणापूर्वी अर्धा तास आधी रिपोर्टिंग करावी.
१५. मदतनीस आणि बॅकस्टेजचे ३ कलावंत रंगमंचावर येऊ नयेत, जर ते आले तर ते स्पर्धक म्हणून गणले जातील. त्यांचा आवाज/संगीत पडद्यामागूनच वापरावे.
१६. सदरील कलाप्रकारात वैयक्तिक / धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जत यासारख्या प्रकाराला हरकत राहील आणि यांची परवानगी नाही. असे प्रकार आढळल्यास आपला संघ बाद ठरवण्यात येईल.
१७. मूल्यांकन प्राधान्याने **एकांकिकेची गोष्ट/संहिता व आशय (Theme), अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन, प्रकाश, संगीत** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii. प्रहसन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४** आणि **कमाल ६ विद्यार्थी** संघात सहभागी असतील.
२. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल. वेळ गणना घोषणा सुरू होताच किंवा पडदा पूर्णपणे उघडल्यानंतर सुरू होईल, यापैकी जे अगोदर होईल त्यानुसार असेल.
३. **मंच/वाद्य व्यवस्था** करण्यासाठी जास्तीत जास्त **३ मिनिटे** दिली जातील.
४. साथी कलाकारांची संख्या **कमाल ३** असेल.
५. रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत वापरता येईल.
६. सहभागी संघांनी आपल्या **प्रहसनाचा सारांश /गोष्ट चार प्रतीमध्ये** विद्यापीठाच्या युवा महोत्सव आयोजन समितीकडे रिपोर्टिंगच्या वेळी देणे आवश्यक आहे, त्यावर संघाचा कोड क्रमांक लिहिलेला

असावा. महाविद्यालया संबधीची खुण किंवा ओळख पटणारी माहिती जर लिहिली असेल तर तो संघ बाद ठरविण्यात येईल.

७. स्किटमध्ये **राष्ट्रीय / सामाजिक महत्त्वाच्या विषयावर** भर दिला जावा. वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा, किंवा धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती, व्यक्तिमत्त्वावर आक्षेप घेणारे वर्तन इत्यादीस परवानगी नाही, असे आढळल्यास तो संघ बाद करण्यात येईल. तसेच हमीपत्रानुसार संबंधित महाविद्यालयाचे सांस्कृतिक समन्वयक, प्राचार्यांवर कारवाई करण्यात येईल.

८. अश्लीलता किंवा कडवट किंवा अप्रत्यक्षपणे खोचक अशा विनोदांना टाळावे, उपहासात्मक लेखन आणि लिखाणात निखळ विनोद अपेक्षित आहे.

९. मूल्यांकन प्राधान्याने **प्रहसनातील गोष्ट/आशय (Theme) व उपहास, अभिनय, सांघिक समन्वय, नेपथ्य, रचना** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv. मूक अभिनय (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४ आणि कमाल ६ विद्यार्थी** संघात सहभागी होऊ शकतील.

२. सहभागी विद्यार्थ्यांनी **पांढऱ्या/काळ्या तंग** (स्कीन टाईट) **कपड्यांमध्ये, चेहरा पांढरा,** चेहऱ्यावर रंगाने **उंचावलेल्या भुवया आणि मोठमोठ्या पसरट ओठांची रंगभूषा** असावी.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते जास्तीत जास्त ५ मिनिटे** असेल.

४. साथी कलाकारांची संख्या **कमाल २** असेल.

५. मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त **३ मिनिटे** दिली जातील.

६. मूकनाट्यात **फक्त हावभाव आणि हालचालींनी संकल्पना व्यक्त करणे** अपेक्षित आहे. प्रॉप्सचा वापर करण्यास परवानगी नसेल; परंतु सादरीकरण अधिक प्रभावी करण्यासाठी संगीत वापरता येईल.

७. संहितेचा मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील सारांश-**चार प्रतीमध्ये** विद्यापीठाच्या युवा महोत्सव आयोजन समितीकडे रिपोर्टिंगच्या वेळी देणे आवश्यक आहे, त्यावर संघाचा कोड क्रमांक लिहिलेला असावा. महाविद्यालया संबधीची खुण किंवा ओळख पटणारी माहिती जर लिहिली असेल तर तो संघ बाद ठरविण्यात येईल.

८. सादरीकरणात वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा, धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती, व्यक्तिमत्त्वावर आक्षेप घेणारे वर्तन इत्यादीस परवानगी नाही. असे आढळल्यास तो संघ बाद करण्यात येईल.

९. मूल्यांकन प्राधान्याने **विषय व संकल्पना, सादरीकरणातील सर्जनशीलता, अभिनय, रंगभूषा, वेशभूषा, सांघिक समन्वय व हालचाल, संगीत आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## V) ललित कला विभाग

### i. रांगोळी (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **ठरलेल्या जागेवर** होईल आणि **दिलेल्या विषयावर रांगोळी** काढावी लागेल.

३. रांगोळी पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.
४. रांगोळी काढण्यासाठी **२ × २ फुट** जागा आखून दिली जाईल.
५. रांगोळीसाठी **फक्त रांगोळी पावडर आणि रंगीत रांगोळी पावडरचा** वापर करावा.
६. सहभागी विद्यार्थ्यांने पांढरी रांगोळी, रंगीत रांगोळी इ. साहित्य स्वतः आणावे.
७. मूल्यांकन **संकल्पना, रंगसंगती, रेखाटन, प्रमाणबद्धता, नावीन्य, कल्पकता** आणि **एकूण दृश्य प्रभाव** यावर आधारित असेल.

### ii. चित्रकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **केवळ १ स्पर्धक** सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धा **ऑन द स्पॉट** होईल, पेंटिंगचा विषय त्याच ठिकाणी संबंधित स्पर्धा प्रमुख/परीक्षक देतील.
३. चित्रकला पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.
४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ ड्रॉइंग पेपर (२२ × १५ इंच)** असेल, जो **विद्यापीठामार्फत देण्यात येईल.**
५. पेंटिंग **ऑईल, वॉटर, पोस्टर किंवा पेस्टल रंगांमध्ये** करता येईल.
६. सहभागी विद्यार्थ्यांने आपले साहित्य (ब्रशेस, रंग इ.) स्वतः आणावे.
७. मूल्यांकन प्राधान्याने **विषय, रचना, रंगसंगती व छायाचित्रण, रेखाटन व सुबकता, कल्पकता, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii. कोलाज-चिकटकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धा नियोजित जागेवर संपन्न होईल, त्याच ठिकाणी संबंधित स्पर्धा प्रमुखांनी दिलेल्या विषयावर कोलाज तयार करावा लागेल.
३. कोलाज पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.
४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ माउंट बोर्ड पेपर (२२ × १५ इंच)** असेल, जो विद्यापीठाद्वारे पुरवण्यात येईल.
५. कोलाज तयार करण्यासाठी **जुनी मासिके, वृत्तपत्राच्या पुरवण्या** वापरणे आवश्यक आहे. हे साहित्य स्पर्धकाने स्वत: आणावे.
६. सहभागी विद्यार्थ्यांने लागणारे साहित्य जसे-कात्री, चिकटवण्याचे साहित्य वगैरे स्वतः आणावे.
७. मूल्यांकन प्राधान्याने **मानसचित्र, विषय, माध्यम हाताळणे, रचना, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv. पोस्टर स्पर्धा (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धा **ठरलेल्या जागेवर** होईल आणि दिलेल्या विषयावर पोस्टर तयार करावे लागेल.

३. पोस्टर पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ माउंट बोर्ड पेपर (२२ × १५ इंच)** असेल, जो विद्यापीठाद्वारे देण्यात येईल.

५. पोस्टर **वॉटर, पोस्टर किंवा पेस्टल रंगांमध्ये** तयार करावे.

६. सहभागी विद्यार्थ्याने आपले साहित्य (ब्रशेस, रंग इ.) स्वतः आणावे.

७. मूल्यांकन प्राधान्याने **आशय व संकल्पना, साहित्याचा कल्पक वापर, रचना, प्रमाणबद्धता व रंगसंगती, टॅगलाईन** आणि **एकूण दृश्य प्रभाव** यावर आधारित असेल.

### v. मृदमूर्तीकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा नियोजित जागेवर संपन्न होईल आणि **दिलेल्या विषयावर क्ले मॉडेल** तयार करावे लागेल.

३. मॉडेल पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. माती विद्यापीठाद्वारे पुरवण्यात येईल.

५. सहभागी विद्यार्थ्याने लागणारे उर्वरित साहित्य स्वतः आणावे.

६. मूल्यांकन प्राधान्याने **आशय व संकल्पना, रचना व प्रमाणबद्धता, शरीरशास्त्र, माध्यम हाताळणे, रचना, सुबकता** आणि **एकूण दृश्य प्रभाव** यावर आधारित असेल.

### vi. व्यंगचित्र (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **ठरलेल्या जागेवर** होईल आणि दिलेल्या विषयावर व्यंगचित्र तयार करावे लागेल.

३. व्यंगचित्र पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ ड्रॉइंग पेपर (२२ × १५ इंच)** असेल, जो विद्यापीठाद्वारे देण्यात येईल.

५. सहभागी विद्यार्थ्याने कागद वगळता लागणारे अन्य साहित्य स्वतः आणावे.

६. मूल्यांकन प्राधान्याने **संकल्पना, उपहास व विनोद, रेखाटन व व्यंग, रंगसंगती, कल्पकता व नावीन्य, कॅप्शन** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### vii. स्थळ छायाचित्रण - स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** सहभागी होऊ शकेल.

२. सहभागी विद्यार्थ्याने स्वतःचा **डिजिटल कॅमेरा** सोबत आणावा.

३. डिजिटल कॅमेऱ्यात **मेमरी कार्ड असावे**, ते मेमरी कार्ड स्पर्धेच्या आधी परीक्षकांकडून फॉरमॅट केले जाईल.

४. फोटोग्राफी पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ दिली जाईल.

५. सहभागी विद्यार्थ्याने **दिलेल्या विषयावर फक्त ५ सर्वोत्तम छायाचित्रे** सादर करावीत.

६. छायाचित्रांमध्ये **मिक्सिंग, मॅचिंग किंवा मॉर्फिंग** करण्यास परवानगी नाही.

७. **फोटोशॉप, पिकासा किंवा इतर सॉफ्टवेअरचा** वापर करून प्रतिमा सुधारण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

८. आयोजकांकडे या छायाचित्रांचा **कधीही आणि कुठेही वापर करण्याचा सर्व अधिकार असेल.**

९. अतिरिक्त सूचना स्पर्धा सुरू होण्याच्या वेळी दिल्या जातील.

१०. मूल्यांकन प्राधान्याने **विषयीची समज, तांत्रिक कौशल्य व एक्सपोजर, रचना व दृष्टिकोन, कल्पकता व नावीन्य, तांत्रिक गुणवत्ता** आणि **एकूण दृश्य प्रभाव** या आधारावर होईल.

## viii. इंस्टॉलेशन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ३ आणि कमाल ४ विद्यार्थी** सहभागींचा एक संघ असेल.

२. सहभागी स्पर्धकांना स्पर्धेच्या प्रभारी / प्रमुखांकडून जागेवरच जाहीर केल्या जाणाऱ्या विषय, मथळा किंवा संकल्पनेशी संबंधित वातावरणाची उभारणी किंवा निर्मिती करावी लागेल.

३. सहभागी फक्त एकच इंस्टॉलेशन तयार करतील, **ज्याचा आकार ५ फूट × ५ फूट** यापेक्षा मोठा नसावा.

४. इंस्टॉलेशन पूर्ण करण्यासाठीची वेळ **कमाल २ तास ३० मिनिटे** असेल.

५. सहभागी कार्टूनिंग, चित्रकला, रांगोळी, पोस्टर, कोलाज, मातीची मूर्ती बनवणे इत्यादी इतर कलाकृतींमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्व साहित्याचा वापर करू शकतात.

६. सहभागी परिसरातील उपलब्ध असलेले कचऱ्याचे (वेस्ट) साहित्य किंवा बाहेरून आणलेले कोणतेही साहित्य वापरू शकतात.

७. बाजारात उपलब्ध असलेल्या आधीच तयार केलेल्या प्रतिमा किंवा आकारांचा वापर करण्यास परवानगी नसेल. स्पर्धकांनी कच्च्या साहित्याचा वापर करून स्वतःची प्रतिमा किंवा रचना तयार करावी.

८. मूल्यमापन प्राधान्याने **विषय सादरीकरण, साहित्याचा कल्पक वापर, अवकाशाचा वापर व रचना, समन्वय, नावीन्यता** आणि **एकंदर प्रभाव** या गुणांवर आधारित असेल.

## ix. लघुपट (Short Film) (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने नोंदणी प्रक्रियेच्या वेळी **नोंदणी कक्षात लघुपट** पेन ड्राइव्हमध्ये **जमा करणे अनिवार्य आहे.**

२. जमा केलेले पेनड्राइव्ह केंद्रीय युवा महोत्सव संपन्न झाल्यानंतर ३० ऑक्टोबर २०२६ नंतर संचालक, विद्यार्थी विकास येथून प्राप्त करुन घेता येतील.

३. सहभागी संघाने **कोणत्याही विषय/थीमवर लघुपट तयार करावा.**

४. स्पर्धेत सादर करावयाचा लघुपट **१ जुलै २०२६ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत** तयार केलेला असावा. या तारखेत लघुपट तयार केला असल्याचे **प्राचार्यांचे प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे.**

५. लघुपटामधील सर्व प्रमुख/ सहायक भूमिका **सहभागी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीच कराव्यात.**

६. लघुपट तयार करण्यासाठी किंवा सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांच्या संख्येवर कोणतेही बंधन नाही.

७. स्पर्धा **चित्रपट संकल्पनेवर आधारित आहे, त्यामुळे कोणतेही माहितीपट (डॉक्युमेंटरी) स्वीकारले जाणार नाहीत.**

८. लघुपटातील कथा / संवाद / गीत / संगीत इ. द्वारे **कोणत्याही व्यक्ती, समाज, धर्म** वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा, किंवा धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती, व्यक्तिमत्त्वावर आक्षेप घेणारे वर्तन इत्यादीस परवानगी नाही. असे आढळल्यास आपला संघ बाद करण्यात येईल.

९. लघुपटाचा कालावधी **जास्तीत जास्त ५ मिनिटे आणि किमान ३० सेकंद** असावा.

१०. वेळेच्या मर्यादेपलीकडे असलेला लघुपट स्पर्धेत नाकारला जाईल.

११. लघुपटामध्ये **क्रेडिट लिस्ट** नमूद करण्यास मनाई असेल.

१२. यापूर्वी इतर कोणत्याही स्पर्धेत/महोत्सवात सादर केलेला लघुपट या स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. जर असे आढळल्यास, तो अपात्र ठरेल आणि बक्षीस परत घेण्यात येईल.

१३. लघुपट **MPEG4 किंवा AVI फॉरमॅटमध्ये** शूट केला जावा. याचे गुणोत्तर - **१६:९ किंवा १६:९ फुल हाइट ॲनामॉर्फिक-DV/HDV स्वरूपात.**

१४. **दिग्दर्शन, पटकथा लेखन, संवाद लेखन, गीत लेखन, संगीत दिग्दर्शन, कॅमेरा शूटिंग, प्रकाशयोजना, कला दिग्दर्शन, एडिटिंग** विद्यार्थ्यांनी केलेले असावे.

१५. एकदा निवडलेला आणि सादर केलेला लघुपट **कोणत्याही परिस्थितीत परत मागता येणार नाही.**

१६. पारितोषिकप्राप्त **लघुपटांचे प्रदर्शन** पारितोषिक वितरण समारंभाच्यापूर्वी आयोजित करण्याचा प्रयत्न राहील.

१७. मूल्यांकन प्राधान्याने **कथा, पटकथा व आशय; दिग्दर्शन व अभिनय, निर्मिती (कॅमेरा, प्रकाशयोजना, फ्रेमिंग), पोस्ट-प्रॉडक्शन (एडिटिंग, ट्रांझिशन, सातत्य), प्रतिमा (फोकस, रंग, प्रकाश)** आणि **ध्वनी गुणवत्ता (स्वर स्पष्टता, आवाजाचा सातत्यपूर्ण स्तर)** यावर आधारित असेल.

*** शोभायात्रा (Procession) (सांघिक स्पर्धा)**

१. **उद्घाटन समारंभाच्या अगोदर** सहभागी महाविद्यालयांच्या संघांची सांस्कृतिक मिरवणूक-शोभायात्रा आयोजित करण्यात येईल.

२. सर्व सहभागी संघांनी जिल्हा युवा महोत्सवातील शोभायात्रेत सहभाग घेणे **अनिवार्य** आहे.

३. शोभायात्रेकरिता विषय महोत्सवाच्या पाच दिवस अगोदर कळविण्यात येईल.

४. सहभागी संघाने निर्देशित विषयानुसार **राष्ट्रीय/सामाजिक विषयाला प्राधान्य द्यावे.**

५. सहभागी संघाने **आपल्या महाविद्यालयाचे बॅनर** मिरवणुकीत आणावे आणि ते संघांमध्ये सर्वात समोर असावे.

६. मूल्यांकन प्राधान्याने **आशय (Theme), वेशभूषा, रंगभूषा आणि देखावा; वाद्ये/साधने व कलाविष्कार; शिस्त व समन्वय; ऊर्जा** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## १४. कलाप्रकार सारांश

| विभाग | अ. क्र. | कार्यक्रम | सहभागी कलावंत संख्या | साथी कलावंत- कमाल संख्या | मंच / वाद्य / प्रकाश व्यवस्था करण्यासाठी कमाल वेळ | सादरीकरणाची वेळ (किमान- कमाल) |
|---|---|---|---|---|---|---|
| **संगीत** | | | | | | |
| | १. | भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक) | **०१** | ०२ | ०३ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | २. | भारतीय शास्त्रीय वाद्य (तालवाद्य) (वैयक्तिक) | **०१** | ०१ | ०३ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | ३. | भारतीय शास्त्रीय वाद्य (सुरवाद्य) (वैयक्तिक) | **०१** | ०१ | ०३ मिनिटे | ०८ -१० मिनिटे |
| | ४. | नाट्यसंगीत (वैयक्तिक) | **०१** | ०२ | ०३ मिनिटे | ०५- ०७ मिनिटे |
| | ५. | भारतीय सुगम गायन (वैयक्तिक) | **०१** | ०२ | ०३ मिनिटे | ०४ - ०६ मिनिटे |
| | ६. | भारतीय समूह गायन (सांघिक) | **०४ - ०६** | ०३ | ०५ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | ७. | लोक वाद्य वृंद (सांघिक) | **०६ - ०९** | ०३ | १० मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | ८. | पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक) | **०१** | ०२ | ०३ मिनिटे | ०४ - ०६ मिनिटे |
| | ९. | पाश्चात्य वाद्य वादन (वैयक्तिक) | **०१** | ०२ | ०३ मिनिटे | ०५-०७ मिनिटे |
| | १०. | पाश्चात्य समूह गायन (सांघिक) | **०४ - ०६** | ०३ | ०५ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| **नृत्य विभाग** | | | | | | |
| | १. | भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक) | **०१** | ०३ | ०३ मिनिटे | १२ - १५ मिनिटे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २. | भारतीय लोक/ आदिवासी नृत्य (सांघिक) | **०८ - १०** | ०५ | ०५ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| **वाङ्मय विभाग** | | | | | | |
| | १. | वक्तृत्व (वैयक्तिक) | **०१** | -- | -- | ०४-०५ मिनिटे |
| | २. | वादविवाद (वैयक्तिक) | **०२** | -- | -- | ०४-०५ मिनिटे |
| | ३. | प्रश्नमंजुषा (सांघिक) | **०३** | -- | -- | प्राथमिक फेरी : ३० मिनिटे<br>अंतिम फेरी : वेळ जाहीर केली जाईल |
| **नाट्य विभाग** | | | | | | |
| | १. | मिमिक्री - नकला (वैयक्तिक) | **०१** | -- | -- | ०४ - ०५ मिनिटे |
| | २. | एकांकिका (सांघिक) | **०२ - ०९** | ०३ | १० मिनिटे | २५ - ३० मिनिटे |
| | ३. | प्रहसन (सांघिक) | **०४ - ०६** | ०३ | ०३ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | ४. | मूकअभिनय (सांघिक) | **०४ - ०६** | ०२ | ०३ मिनिटे | ०४ - ०५ मिनिटे |
| **ललित कला विभाग** | | | | | | |
| | १. | रांगोळी (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | २. | चित्रकला (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ३. | कोलाज (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ४. | पोस्टर (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ५. | क्ले मॉडेलिंग (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ६. | व्यंगचित्र (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ७. | स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ८. | इन्स्टॉलेशन (सांघिक) | **०३ - ०४** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | ९. | लघुपट (सांघिक) | मर्यादा नाही | मर्यादा नाही | मर्यादा नाही | ३० सेकंद-०५ मि. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **शोभायात्रा** | | | | | | |
| | १. | शोभायात्रा (सांघिक) | मर्यादा नाही | मर्यादा नाही | मर्यादा नाही | परीक्षकांद्वारे कळविण्यात येईल. |

### ❖ पारितोषिक / फिरते चषक

१. जिल्हा व केंद्रीय युवा महोत्सवातील कलाप्रकारनिहाय प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक संपादन करणाऱ्या विद्यार्थी कलावंतांना समारोप संमारंभात स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

२. संगीत, नृत्य, वाङ्मय, नाट्य व ललित कला या चार विभागात जिल्हास्तरावर सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या संघास त्या त्या विभागातील उत्कृष्ट संघ म्हणून पारितोषिक प्रदान केले जाईल.

**शोभायात्रा वगळता प्रत्येक कलाप्रकारात जिल्हा युवा महोत्सवात केवळ प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक प्राप्त संघ केंद्रीय युवा महोत्सवातील अंतिम स्पर्धेसाठी पात्र असतील.**

याशिवाय केवळ केंद्रीय युवा महोत्सवात खालील पारितोषिके प्रदान करण्यात येतील.

१. कलाप्रकारनिहाय वैयक्तिक स्पर्धांसाठी (Solo/Individual) विद्यार्थी कलावंतांना आणि समूह (Group) स्पर्धांसाठी संघाला सन्मानचिन्ह प्रदान केले जाईल.

२. **कै. जगन्नाथराव नाडापुडे यांच्या स्मरणार्थ नाट्यगटातील सर्वोत्कृष्ट संघासाठी फिरते चषक** (पंचरंग प्रतिष्ठान तुळजापूर, श्री. श्रीकांत नाडापुडे यांच्याकडून)

३. विद्यापीठाद्वारे **प्रा. दिलीप बडे यांच्या स्मरणार्थ ललित कला गटातील सर्वोत्कृष्ट संघासाठी फिरते चषक**

### ❖ फिरते चषक (Rotating Trophies) : केवळ केंद्रीय युवा महोत्सवातील विजेत्यांकरिता -

१. गतविजेत्या महाविद्यालयाने फिरते चषक विद्यापीठाकडे पुढील युवा महोत्सवापूर्वी जमा करावे.

२. जर सलग तीन वर्ष एखाद्या महाविद्यालयाने एखादे फिरते चषक जिंकले असेल तर ते चषक त्या महाविद्यालयास कायमस्वरूपी प्रदान करण्यात येईल. त्यानंतर प्रायोजकांनी नवीन चषक तयार करून विद्यापीठास द्यावे.

३. सर्व फिरते चषक व अन्य सन्मानचिन्ह बक्षीस वितरण समारंभादरम्यान मुख्य रंगमंचावर प्रदर्शनासाठी ठेवण्यात येतील.

४. विजेत्या महाविद्यालयाने फिरत्या चषकांची सुरक्षित हाताळणी करावी. तसेच पुढील महोत्सवापूर्वी चषक विद्यापीठाकडे सुपूर्द करावे.

### ❖ फिरत्या चषकांचे वितरण :

१. विभागनिहाय फिरते चषक (Rotating Trophy) प्रत्येक विभागात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या सहभागी संघाला प्रदान केले जाईल.

२. उत्कृष्ट ग्रामीण संघाकरिताचे सर्वसाधारण विजेतेपद ग्रामपंचायत/नगरपरिषद असलेल्या ठिकाणचा सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या संघास देण्यात येईल.

३. उत्कृष्ट संघाकरिताचे सर्वसाधारण विजेतेपद सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शहरी संघास प्रदान करण्यात येईल.

## ❖ प्रमाणपत्रे :

१. जिल्हा व केंद्रीय युवा महोत्सवातील सर्व संघांना **सहभागाची ई-प्रमाणपत्रे** (e-certificate) महाविद्यालयाच्या लॉग-इन मध्ये केंद्रीय महोत्सव संपल्यानंतर यथावकाश उपलब्ध करून दिली जातील.

२. सहभागी महाविद्यालयासही **सहभागाची ई-प्रमाणपत्रे** (e-certificate) महाविद्यालयाच्या लॉग-इन मध्ये केंद्रीय महोत्सव संपल्यानंतर यथावकाश उपलब्ध करून दिली जातील.

३. **प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक** मिळवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी कलावंताला पारितोषिक वितरण कार्यक्रमात **गौरव प्रमाणपत्र** प्रदान केले जाईल.

४. **विभागनिहाय उत्कृष्ट संघ आणि सर्वसाधारण विजेतेपद (केवळ केंद्रीय युवा महोत्सव)** जिंकणाऱ्या संघांनाही पारितोषिक वितरण कार्यक्रमात **गौरव प्रमाणपत्र** दिले जाईल.

५. सल्लागार समिती, आयोजन समिती, उपसमिती, स्वयंसेवक आणि अन्य (असल्यास) सदस्यांना **आभार प्रमाणपत्रे डिजिटल** (e-certificate) स्वरूपात आयोजक महाविद्यालयास ई-मेलद्वारे केंद्रीय युवा महोत्सव संपल्यानंतर पाठवली जातील.

## ❖ स्लॉट्स

१. त्या-त्या जिल्ह्याच्या महोत्सव उद्घाटन समारंभानंतर आयोजक महाविद्यालय व विद्यापीठाद्वारे संघ व्यवस्थापकांच्या बैठकीत प्रत्येक कार्यक्रमासाठी स्लॉट्स निश्चित केले जातील.

२. संघाचे कोड क्रमांक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभापूर्वी कळविण्यात येतील.

३. सहभागी संघांनी आणि स्थळ प्रमुख, रंगमंच प्रमुख व सहाय्यकांनी दिलेल्या सादरीकरण क्रमांकाचे पालन करणे बंधनकारक आहे; नसता तीन कॉलनंतर त्या संघास बाद करण्यात येईल.

४. सर्व सूचना WhatsApp ग्रुपवर देण्यात येतील. त्याचे पालन न करता अरेरावी करणे/वाद घालणे वा महाविद्यालय प्रतिनिधी/ प्राध्यापक/ संघव्यवस्थापक यांच्याशिवाय कोणत्याही संघटनेद्वारा सादरीकरणासंदर्भात हस्तक्षेप केल्यास संबंधित महाविद्यालयाविरूद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

५. WhatsApp/Facebook वा अन्या सोशल मीडियामध्ये महोत्सव आयोजनाविषयी टीका-टिप्पणी वा निंदा नालस्ती करणारा मजकूर पोस्ट केल्यास विद्यापीठाद्वारे कारवाई करण्यात येईल.

६. कोणत्याही कलाप्रकाराचे सादरीकरण करण्यास संघ टाळाटाळ करीत असेल वा वेळेवर येत नसेल अशा परिस्थितीत ३० मिनिटानंतर त्या संघास ५०० रू दंड करण्यात येईल.

## ➢ ऑनलाइन नोंदणी

संघ/ महाविद्यालयाने जिल्हा व केंद्रीय युवा महोत्सवासाठी एकत्रितपणे ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक आहे.

- नोंदणी **दि. १ ऑगस्ट २०२५ ते १७ ऑगस्ट २०२५** या कालावधीत पूर्ण करावी लागेल.

**i) ऑनलाईन नोंदणी पोर्टलमध्ये खालील बाबींचा समावेश आहे**

१. महाविद्यालयाची सामान्य माहिती (नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, प्राचार्यांची माहिती)
२. पुरुष व महिला संघ व्यवस्थापकांचा तपशील
३. संघाची (विद्यार्थी कलावंतांची) माहिती
४. सहभागी कार्यक्रमांची माहिती
५. सहभागी **विद्यार्थी कलावंत व संघव्यवस्थापकांचे पासपोर्ट फोटो व आवश्यक कागदपत्रे अपलोड** करणे अनिवार्य आहे.
६. **प्राचार्यांचे** कलासादरीकरणविषयक **हमीपत्र अपलोड** करणे अनिवार्य आहे.
७. डाउनलोड्स व प्रिंटआउट्स (हार्डकॉपी)

## प्रवेशिका जमा करणे व कागदपत्र पडताळणी

१. ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर सर्व फॉर्म, प्रपत्रे व आवश्यक कागदपत्रे (सहभागी कलावंतांचे आधार कार्ड, एस.एस.सी. प्रमाणपत्र, शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक, बोनाफाईड प्रमाणपत्र, प्रवेश पावती, प्राचार्यांचे हमीपत्र इत्यादी) दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत प्रत्यक्ष **संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर** येथे प्रत्यक्ष जमा करणे अनिवार्य आहे.
२. दि. २२ ऑगस्ट २०२६ नंतर कोणत्याही प्रकारे हार्डकॉपी स्वीकारल्या जाणार नाही.
३. कागदपत्रे टपालाद्वारे पाठवल्यास ती स्वीकारल्या जाणार नाहीत.
४. ज्या संघाने प्रवेशिका आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांसह संचालक, विद्यार्थी विकास यांच्याकडे जमा केलेल्या आहेत, अशाच संघांचा सादरीकरण वेळापत्रकामध्ये समावेश करण्यात येईल.
**५. प्रवेशिका वा कागदपत्रे अपूर्ण असल्यास संबंधित महाविद्यालयास सल्लागार समितीने निर्धारित केलेला आर्थिक दंड भरावा लागेल.** त्याची संपूर्ण जबाबदारी **प्राचार्य व सांस्कृतिक समन्वयकांची असेल.**
६. नोंदणी कक्षावर समितीद्वारे आवेदनपत्राच्या हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रे (विद्यार्थ्यांचे दहावी बोर्ड प्रमाणपत्र, शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील प्रवेश पावती, बोनाफाइड, विद्यार्थी व संघप्रमुखांचे ओळखपत्र, आधार कार्ड, पीआरएन, प्राचार्यांचे हमीपत्र, सर्व प्रपत्रे इ.) तपासली जातील.
७. कागदपत्रांतील विसंगतीबाबत आयोजन समिती अध्यक्ष मा. कुलगुरू आणि आयोजन सचिव संचालक, विद्यार्थी विकास तसेच संबंधित संघप्रमुख यांना माहिती देण्यात येईल.
८. कागदपत्रांतील विसंगती, चुकीची वा खोटी माहिती आढळल्यास सहभागींना अपात्र ठरवून त्यांच्यावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार** कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच सल्लागार समितीच्या निर्णयाप्रमाणे प्रतिविद्यार्थी रु. १०,०००/- प्रमाणे महाविद्यालयास दंड आकारण्यात येईल.

## ❖ नोंदणी कक्ष

१. जिल्हानिहाय महोत्सवात रिपोर्टिंग-स्वागत कक्ष असेल. तेथे प्रथमत: संघाची रिपोर्टिंग करणे अनिवार्य आहे.
२. रिपोर्टिंग केवळ महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सकाळी ९.०० वा. पूर्वी करणे अनिवार्य आहे. त्यानंतर आलेला संघ रिपोर्टिंगकरिता ग्राह्य नसेल.
३. नोंदणी समिती नियोजित वेळापत्रकानुसार काम करेल.
४. नोंदणी कक्षात / सांस्कृतिक समन्वयक / संघ प्रमुखांनी प्रवेशिकेची कार्यालयीन प्रत (O.C.) / महाविद्यालयाचे ओळखपत्र दाखवल्यानंतर युवा महोत्सव किट देण्यात येतील.
५. कागदपत्रांतील विसंगती, चुकीची वा खोटी माहिती आढळल्यास सहभागींना अपात्र ठरवून त्यांच्यावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार** कठोर कारवाई करण्यात येईल.

## ➢ प्रवेशिकेसोबत सादर करावयाची कागदपत्रे :

सहभागी महाविद्यालयाच्या संघ व्यवस्थापकाद्वारे खालील कागदपत्रे सादर करावे लागतील-

१. **एकत्रित प्रपत्रांची प्रिंटआउट** (नोंदणी पोर्टलवरून डाउनलोड केलेली कागदपत्रे) (मूळ)
२. **सर्व सहभागी विद्यार्थी कलावंतांच्या फॉर्म्सचे प्रिंटआउट्स** (नोंदणी पोर्टलवरून डाउनलोड केलेले) (मूळ)
३. सर्व सहभागी कलावंतांचे **विद्यमान शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र** (मूळ व प्रमाणित छायाप्रत)
४. सर्व सहभागी कलावंतांची **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश पावती**
५. सर्व सहभागी कलावंतांचे **दहावी बोर्ड प्रमाणपत्र** (प्रमाणित छायाप्रत)
६. मागील **सत्र परीक्षा गुणपत्रिका** (प्रमाणित छायाप्रत)
७. सहभागी **विद्यार्थ्यांचे हमीपत्र** (मूळ) (परिशिष्ट १)
८. सहभागी विद्यार्थ्यांकडून **जबाबदारी प्रमाणपत्र** (मूळ) (परिशिष्ट २)
९. सहभागी विद्यार्थ्यांचे ***बोनाफाईड प्रमाणपत्र*** (मूळ) (परिशिष्ट ३)
१०. सहभागी विद्यार्थ्यांचे ***पडताळणी प्रमाणपत्र*** (मूळ) (परिशिष्ट ५)
**११. प्राचार्यांचे हमीपत्र**
१२. **नमुना 'आय'** नोंदणी पुरावा/ सेन्सॉर प्रमाणपत्र
१३. विद्यार्थी कलावंत आणि संघप्रमुखांचा प्रत्येकी **१ पासपोर्ट** फोटो

## ➢ कार्यक्रमस्थळी कार्यक्रम प्रमुखांकडे सादर करावयाची कागदपत्रे

सहभागी संघाने विद्यार्थी कलावंतांची खालील कागदपत्रे कार्यक्रमाच्या स्थळी **प्रत्येक कलाप्रकाराच्या सादरीकरणापूर्वी १० मिनिटे अगोदर कार्यक्रम/स्टेज रिपोर्टिंग प्रमुखांकडे** सादर करणे अनिवार्य आहे.

१. सहभागी कलावंतांची युवा महोत्सव ओळखपत्रे (आय कार्ड)
२. संबंधित कागदपत्रांवर संघाचा **संकेतांक** नमूद करावा.
३. कागदपत्रांवर **महाविद्यालय किंवा सहभागी कलावंताचे नाव** नमूद करू नये.

४. कार्यक्रम प्रमुखांद्वारे ही कागदपत्रे संबंधित कलाप्रकाराच्या **परीक्षकांना सादरीकरणाच्या वेळी** प्रदान केली जातील.

५. **क्रमांकानुसार विभाग, कार्यक्रम आणि सादर करावयाची कागदपत्रे**

| अ.क्र. | विभाग | कार्यक्रम | सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १. | संगीत | **भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक)** | a) **राग, ताल आणि बंदिश यांच्या** मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **तीन प्रती**. |
| | | **नाट्यसंगीत (वैयक्तिक)** | a) **नाट्यपदाच्या (गाणे)** मराठी/ हिंदी/ इंग्रजी **भाषेतील तीन प्रती.**<br>b) नाट्यपद (गाणे) जर मराठी/ हिंदी व्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेत असेल, तर त्या गाण्याचा (नाट्यपदाचा) अर्थ मराठी/ हिंदी /इंग्रजी भाषेतील तीन प्रती. |
| | | **भारतीय सुगम गायन (वैयक्तिक)** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **गाण्याच्या तीन प्रती**<br>b) जर गाणे मराठी/ हिंदी व्यतिरिक्त इतर भाषेत असेल, तर **गाण्याचा** मराठी/ हिंदी /इंग्रजी भाषेतील **अर्थाच्या तीन प्रती** |
| | | **भारतीय समूह गायन (सांघिक)** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **गाण्यांच्या तीन प्रती**<br>b) जर गाणे/गाणी मराठी/ हिंदी व्यतिरिक्त इतर भाषेत असतील, तर **गाण्यांचा** मराठी/ हिंदी/ इंग्रजी **अर्थ** असलेल्या **तीन प्रती**. |
| | | **लोक वाद्य वृंद (सांघिक)** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेत **कार्यक्रमाचा सारांश- तीन प्रती** |
| | | **पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक)** | a) इंग्रजी भाषेतील **गाण्यांच्या तीन** प्रती.<br>b) **गाण्यांचा अर्थ** इंग्रजी भाषेत - **तीन प्रती**. |
| | | **पाश्चात्य समूह गायन (सांघिक)** | a) इंग्रजी भाषेतील **गाण्यांच्या तीन** प्रती.<br>b) **गाण्यांचा अर्थ** इंग्रजी भाषेत - **तीन प्रती** |
| २. | नृत्य | **भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक)** | a) **नृत्याचे आणि संबंधित गाण्याच्या** मराठी/ हिंदी / इंग्रजी भाषेत **आशयाचे वर्णन- चार प्रती**<br>b) मराठी/ हिंदी / इंग्रजी भाषेत **गाण्यांचा अर्थ चार प्रती** |
| | | **लोक आदिवासी नृत्य (सांघिक)** | a) **नृत्याचा प्रकार/शैलीचे तपशील असलेले** मराठी/ हिंदी /इंग्रजी भाषेत **सारांश- चार प्रती**<br>b) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **गाण्याच्या चार प्रती** किंवा<br>c) जर गाणे मराठी/ हिंदी व्यतिरिक्त इतर भाषेत असेल, तर **गाण्याचा अर्थ** मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत- **चार प्रती** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | नाट्य | **एकांकिका – मराठी/हिंदी (सांघिक)** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **संहितेच्या चार प्रती** किंवा<br>b) जर संहिता मराठी/ हिंदी व्यतिरिक्त इतर भाषेत असेल, तर **संहितेचा सारांश** मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील **वर्णन - चार प्रती**<br>c) एकांकिकेच्या लेखकाचे सादरीकरणासाठीचे परवानगी पत्र, संहिता आणि पात्र परिचय -**चार प्रती**<br>d) नाट्यपरिनिरीक्षण मंडळाचे **संहिता परीक्षण प्रमाणपत्र / नोंदणी पावती - चार प्रती** |
| | | **प्रहसन (सांघिक)** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **संहितेच्या चार प्रती** किंवा<br>b) जर संहिता मराठी /हिंदीव्यतिरिक्त इतर भाषेत असेल, तर **संहितेच्या** मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **सारांश - चार प्रती** |
| | | **मूकअभिनय** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील सारांश-**चार प्रती** |
| ४. | **ललित कला** | **लघुपट** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **विषय/सारांश- चार प्रती** |
| ५. | | **शोभायात्रा** | a) मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेतील **विषय/सारांश- चार प्रती** |

### ➢ गुण गणना : सर्वसाधारण विजेते, विभागनिहाय विजेते

**अ) वैयक्तिक (Solo) कलाप्रकार :**

- प्रथम पारितोषिकासाठी **७ गुण**,
- द्वितीय पारितोषिकासाठी **५ गुण**,
- तृतीय पारितोषिकासाठी **३ गुण**.

**ब) सांघिक (Group) कलाप्रकार :**

- प्रथम क्रमांकासाठी **९ गुण**,
- द्वितीय क्रमांकासाठी **७ गुण**,
- तृतीय क्रमांकासाठी **५ गुण**.

1. **संगीत, नृत्य, नाट्य, वाङ्मय व ललित कला या सर्व कलांचे निकाल** सर्वसाधारण विजेते व विभागनिहाय विजेते आदींसाठी विचारात घेतले जातील.
2. **शोभायात्रा (Procession) व लघुपट (Short Film)** चा निकाल या पुरस्कारांमध्ये समाविष्ट केला जाणार नाही.

### ➢ नोंदणी कीट

विद्यापीठाद्वारे सर्व सहभागी महाविद्यालयांना संपूर्ण संघासाठी नोंदणी कीट प्रदान केली जाईल, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल-

- **ओळखपत्र**
- **युवा महोत्सव निमंत्रण पत्रिका व वेळापत्रक**
- **माहिती पुस्तिका**

## ➢ तक्रार निवारण यंत्रणा

**अ) तक्रार निवारण समिती :**

१. मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार **तक्रार निवारण समिती** गठित केलेली आहे. सदरील समितीकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करता येईल.

२. **तक्रार निवारण समितीने दिलेला निर्णय तक्रारदारावर बंधनकारक असेल.**

३. कोणत्याही सहभागी कलावंताने **थेट तक्रार निवारण समितीच्या सदस्यांशी संपर्क न साधता संबंधित महाविद्यालयाच्या सांस्कृतिक प्रमुख/संघव्यवस्थापकांमार्फत तक्रार लेखी स्वरूपात दाखल करावी लागेल.**

४. **कोणत्याही प्रकारचा आक्षेप/तक्रारीकरिता संबंधित संघाने रूपये ५०००/- एवढे शुल्क** जमा करावे. जर आक्षेप सत्य आढळल्यास सदरील रक्कम संबधित संघास परत करण्यात येईल; मात्र जर आक्षेप/तक्रार खोटी आढळल्यास सदरील रक्कम तक्रारदार संघास परत न मिळता ती विद्यापीठाकडे जमा होईल.

५. **एखाद्या संघास दुसऱ्या संघाविषयी आक्षेप घ्यावयाचा असल्यास** त्यासाठी तो कलाप्रकार संपल्यानंतर कमाल एक तासाच्या आत आक्षेप घ्यावा.

६. **कोणत्याही संघाच्या कलासादरीकरणाविषयी आक्षेप** असल्यास त्या संघाच्या सादरीकरणानंतर तात्काळ आक्षेप घेण्यात यावा; विशिष्ट कलाप्रकाराचे शेवटचे सादरीकरण संपल्यानंतर कोणताही आक्षेप स्वीकारला जाणार नाही. याकरिता संबंधित संघाने रूपये ५०००/- एवढे शुल्क जमा करावे.

७. **कोणत्याही संघातील कलावंतासंदर्भात आक्षेप** असल्यास तो संबंधित कलाप्रकारातील सर्व संघांचे सादरीकरण होण्यापूर्वीच घेण्यात यावा. संबधित कलाप्रकारातील शेवटच्या संघाचे सादरीकरण संपल्यानंतर कोणत्याही प्रकारचा आक्षेप स्वीकारला जाणार नाही.

८. निकाल जाहीर झाल्यानंतर, कोणत्याही वादाच्या बाबतीत, सहभागी संघ व्यवस्थापक तक्रार वैध स्वरूपात **तक्रार निवारण समितीला** सादर करेल. अशी **तक्रार बक्षीस वितरण समारंभानंतर एक तासाच्या आतच दाखल करावी लागेल.** त्यानंतर कोणत्याही स्वरूपात तक्रार स्वीकारली जाणार नाही.

९. जर कोणी गंभीर गैरवर्तन केले किंवा आचारसंहितेचे उल्लंघन केले, तर सहभागी महाविद्यालयातील संबंधित सदस्य/ सदस्यांवर/ संघावर/ संघप्रमुखांवर/ महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कारवाई** केली जाईल.

# अत्यंत महत्त्वाची सूचना

**खालील कला प्रकारांचा स्वतंत्र केंद्रीय लोककला महोत्सव जानेवारी २०२७ मध्ये विद्यापीठ नामविस्तार दिनापूर्वी विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे, कृपया नोंद घ्यावी.**

१. पोवाडा (सांघिक)_ Powada (Group)
२. भारूड (सांघिक)_Bharud (Group)
३. वासुदेव (वैयक्तिक)_Vasudev (Individual)
४. गोंधळ (सांघिक)_Gondhal (Group)
५. भजन (सांघिक)_ Bhajan (Group)
६. लोकगीत (सांघिक)_ Folk Song (Group)
७. लोकनाट्य (सांघिक)_ Folk Drama (Group)
८. लावणी (वैयक्तिक/सांघिक)_ Lavani (Individual/Group)
९. कव्वाली (सांघिक)_ Qawaali (Group)
१०. जलसा (सांघिक)_ Jalsa (Group)
११. कवितावाचन (वैयक्तिक)_Poetry Reading (Individual)

**केंद्रीय लोककला महोत्सवाची स्वतंत्र नोंदणीप्रक्रिया डिसेंबर २०२६ मध्ये सुरू होईल. त्याविषयी स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.**

********

# <u>हमीपत्र</u>

**दिनांक: / /२०२६**

**प्रति,**
मा. संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर,**

**महोदय,**

जिल्हा व केंद्रीय युवा महोत्सव २०२६-२०२७ साठी आम्ही सादर करीत असलेल्या कोणत्याही कलाप्रकारात कुठल्याही प्रकारच्या भावना दुखावतील असा आशय, लेखन व सादरीकरण करणार नाही. शिवाय कुणाच्याही अस्मितेला तडा जाईल, संत व महापुरुषांचा अवमान होईल. अशा असंवैधानिक आशयाचे आमचा संघ / आमचे महाविद्यालय / विभाग कदापि समर्थन करीत नाही व आम्ही तसे करणार नाही. याची निःसंदिग्ध ग्वाही आम्ही देत आहोत. आमच्या कुठल्याही सादरीकरणातून काही अनर्थ घडला, सामाजिक सौहार्द बिघडले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी असेल.

**प्राचार्य / संचालक**

**------------------------------------------------**

**------------------------------------------------**

**------------------------------------------------**

# नमुना - "आय"

[सार्वजनिक करमणकीच्या जागांवर नियंत्रण ठेवण्याविषयीचा नियम १३७ (२) पहा]

करमणुकीच्या कार्यक्रमासाठी लिखाणाच्या योग्यतेच्या प्रमाणपत्रासाठी करावयाचा अर्ज

(१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :

(२) वय :

(२ अ) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक / E-mail. :

(३) पत्ता :

(४) ज्या व्यक्तीच्या अगर मंडळाच्या वतीने अर्ज केला असेल त्या व्यक्तीचे अगर मंडळाचे नाव. :

(५) पत्ता :

(६) कार्यक्रमाचे स्वरुप (तमाशा, मेळा, नाटक इत्यादी) :

(७) पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या लिखाणाचे शीर्षक :

(८) लेखकाचे नाव :

(९) प्रकाशकाचे नाव :

(१०) पत्ता :

(११) प्रकाशनाचे वर्ष :

(१२) पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या पुस्तकांच्या आवृत्तीचा क्रमांक. :

(१३) पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या प्रतींची संख्या :

**अर्जदाराची सही**

**दिनांक :**

---

## महत्त्वाची सूचना

१. अर्जदाराने अर्जाला रुपये २ किंवा ५ चा न्यायालयीन मुद्रांक शुल्क (कोर्ट फी स्टॅम्प) लावणे व संहितेच्या २ प्रती सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्जदारास सही करता येत नसेल तर मामलेदार किंवा पोलीस पाटील यांच्या समक्ष अंगठा वळवून त्याबद्दल त्या अधिकाऱ्याची सही घ्यावी.

३. कोणताही करमणुकीचा कार्यक्रम करण्याची अथवा ठेवण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही इसमाने, असा कार्यक्रम ज्या दिनांकास पहिल्या प्रथम करण्यात अथवा ठेवण्यात यावयाचा असेल त्या दिनांकाच्या निदान दोन महिने अगोदर मंडळाकडून त्या कार्यक्रमाच्या योग्यतेचा दाखला मिळविण्यासाठी अध्यक्षांकडे अर्ज केला पाहिजे.

४. असा अर्ज नमुना "आय" मध्ये करण्यात आला पाहिजे. ज्या कोणत्याही अर्जात मंडळाचे समाधान होईल अशी सदरहू नमुन्यात निर्दिष्ट केलेल्या सर्व तपशिलासंबंधी माहिती नसेल तर त्याचा मंडळाकडून विचार केला जाणार नाही.

---

## कार्यालयीन उपयोगासाठी

(१) पूर्वपरीक्षण शुल्क रुपये :

(२) पावती क्रमांक :

(३) दिनांक :

(४) लिखाण्याच्या नोंदवहीचा क्रमांक :

(५) दिनांक :

## महत्त्वाची सूचना

(६) परिक्षणाचा अहवाल क्रमांक .................................................................. दिनांक ..........................................

श्री. / श्रीमती .................................................................................................................. यांच्या अभिप्रायानुसार

पान ........................................ / सी वर आक्षेपार्ह भाग नमूद केला आहे. तो अर्जदाराला

पत्र क्रमांक .................................... दिनांक .................................... पान .................................... / सी अन्वये

कळवला आहे. अर्जदाराने आक्षेपार्ह भाग मान्य असल्याचे पत्र पान ........................................ / सी वर आहे.

हंगामी / कायम प्रमाणपत्र आक्षेपार्ह भाग नमूद करून मंजुरीसाठी सादर.

**सचिव** :

**अध्यक्ष** :